मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

» पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक » शुक्रवार, ११ एप्रिल २०२५ » वर्ष: ६ » अंक:११३ » पाने-८ » किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## सप्तश्रृंगी गडावर भाविकांची अलोट गर्दी

**वणी, दि. १० प्रतिनिधी**

चैत्रोत्सवानिमित्ताने सप्तशृंगी गडावर भाविकांची गर्दी झाल्यामुळे चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली. आदिमायेचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची अलोट गर्दी झाल्याने गर्दीचे नियोजन चुकले. त्यामुळे पहिल्या पायरीजवळ चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली. यामुळे प्रशासन आणि पोलिस व्यवस्थेची मात्र धावपळ झाल्याचं दिसून आलं.

चैत्रोत्सवानिमित्ताने सप्तशृंगगडावर आदिमायेचे दर्शनासाठी बुधवार रात्रीपासून भाविकांची मोठी गर्दी झाली आहे. अचानक वाढलेल्या संख्येमुळे सप्तशृंग गडाच्या पहिल्या पायरीजवळ चेंगराचेंगरी सदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. भाविकांच्या या गर्दीमुळे मंदिर प्रशासन, पोलिस आणि आपत्ती व्यवस्थापनाची मात्र तारांबळ उडाली होती.

## अग्राग्रलेख
## खरीखरी

### भारतद्रोही त्रिकूट

भारत सरकारने बांगलादेशला भारताच्या जमिनीवरून दुसऱ्या देशात माल पाठवण्यावर बंदी घातली आहे. सध्याच्या परिस्थितीमध्ये हा प्रतिबंध सुयोग्यच आहे. मात्र सध्या बांगलादेशच्या जनतेने नियुक्त न केलेला अनर्थकारी सर्वेसर्वा मोहम्मद युनूसने भारताबरोबर उभा पंगा घेण्याचे ठरवलेले दिसते. चीनच्या पोलादी पंजाखाली येऊन भारताची जी पूर्वोत्तर राज्ये आहेत. त्या भागामध्ये आर्थिक विस्तार करण्याचे त्यांनी आवाहन केलेले होते. भारताला या वक्तव्यामुळे निश्चितच राग येणे स्वाभाविक आहे, किंबहुना ते अत्यावश्यकच आहे. आता बांगलादेशाला तंबी दिल्यामुळे युनूस आणि बांगलादेशातील पाकिस्तानचे आणि चीनचे बगलबच्चे भारताबरोबर सरळ वागतील असे अजिबात वाटत नाही. ज्या शेख मुजीबुर रहमान यांनी पाकिस्तानच्या तावडीतून भारताच्या मदतीने बांगलादेशची मुक्तता केली. त्या शेख मुजीबुर रहमान यांचे पुतळे फोडण्यापर्यंत पाकिस्तानचे आयएसआय एजंट याच बांगलादेशीयां मार्फत पोहोचलेले आहेत. पाकिस्तान आणि बांगलादेश आता पुन्हा एकत्र येतील असे अजिबात वाटत नाही. पण आता पाकिस्तान, चीन आणि बांगलादेश एकत्र येऊन हे राजदोही त्रिकूट भारतावर डोळे वटारण्याला कमी करणार नाही. ही सुद्धा एक शक्यता आहे. त्यामुळेच पाकच्या वायुसेनेचे प्रमुख जलील अहमद बाबर अचानक चीनच्या दौऱ्यावर गेलेले आहेत आणि त्यांनी चीनचे संरक्षण मंत्री डोंग ज्यूंग यांच्याबरोबर चर्चा केलेली आहे. पाकिस्तानची सेना आणि चीन हे दोघेही मिळून बांगलादेशच्या बेकायदा सरकारला पाठिंबा देत आहेत. अर्थात हे सूर्यप्रकाशा इतके स्वच्छ आहे. नेहमीच्या सवयीप्रमाणे चीनला तर शक्य त्या ठिकाणी आपले पाय पसरवायचे आहेतच. चीन पाकिस्तानात एअरबेस बनवण्याची तयारी करीत आहे. 1971 साली भारताने पळता भुई थोडी केलेल्या पाकिस्तानने आपल्या आयएसआय च्या नेटवर्कद्वारे रोहिंगी आर्मी तयार करण्याचे ठरवलेले दिसते. त्याबरोबरच पाकिस्तानची सेना उल्फा सारख्या उग्र वाद्यांना बांगलादेशात पुन्हा मदत देत आहे. म्हणजेच कसेही करून भारताच्या पूर्वोत्तर सीमा काबीज करण्याचा या तीन देशांचा म्हणजेच भारत दोन्ही त्रिकुटाचा इरादा दिसतो आहे. बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी भारतात आश्रय घेतल्यावर अनेक खटल्यांना सामोरे गेलेले युनूस सुडाने पेटलेले आहेत. एकूणच हे भारतद्रोही त्रिकूट भारतावर तिन्ही बाजूंनी हल्ले करण्याच्या योजनेत गुंतलेले आहे. भारताला आपल्या या तिन्ही शेजाऱ्यांपासून असलेला धोका वाढण्यापूर्वीच काहीतरी उपाययोजना करावी लागेल. हे राज्यकर्त्यांनी लक्षात ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. शेख हसीना सत्तेवर असेपर्यंत बांगलादेशची सीमा भयमुक्त होती. पण आता ती सीमाही उग्र वाद्यांच्या हातात जाईल असे दिसते. भारताची चहूबाजूंनी कोंडी करण्याची योजना बांगलादेशाला हाती धरून चीन आणि पाकिस्तानने ठरवलेली दिसते. मात्र हा डाव उधळून लावला. तरच भारताची मुत्सद्देगिरी दिसून येईल. अर्थात आपल्या सरकारलाही हे ठाऊकच आहेच.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# तहव्वूर राणाला भारतात आणले

**नवी दिल्ली, दि. १० वृत्तसंस्था**



मुंबईतील 26/11 दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाईंड तहव्वूर राणाला भारतात आणण्यात आलं आहे. एनआयएचे आयजी बत्रांच्या नेतृत्वात विशेष पथक राणाला घेऊन भारतात आलं आहे. आता तहव्वूर राणाची एनआयए मुख्यालयात चौकशी होणार आहे. मुंबई हल्ल्याच्या कटात सहभागी असलेल्या तहव्वूर राणाला २००९ साली अमेरिकेत अटक करण्यात आली होती. आता त्याला भारतात आणण्यात आले आहे.

अमेरिकन कोर्टाने अनुमती दिलेल्या कलमांनुसारच तहव्वूर राणावर खटला चालवण्यात येणार आहे. अमेरिकेत खटला चालला असताना भारतात पुन्हा खटला का चालवता? असा सवाल तहव्वूर राणानं केला होता. मात्र भारताने राणाचा दावा खोडून काढत आंतरराष्ट्रीय कायद्यांचा दाखला दिला. सोबतच राणावरील आरोप गंभीर असल्याने भारतातही खटला चालवू शकतो असा दावा भारत सरकारच्या वकिलांनी अमेरिकन कोर्टात केला होता.

मुंबई दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार तहव्वूर राणाच्या प्रत्यार्पणाचं इस्रायलकडून स्वागत करण्यात आलं आहे. दहशतवाद्यांना न्याय मिळवून देण्यासाठी भारत सरकारच्या चिकाटीबद्दल आभार असं इस्रायलचे भारतातील राजदूत रुवेन अझर यांनी म्हटलं.

तहव्वूर राणा भारतात आणण्यात आल्यानंतर पाकिस्ताननं मात्र राणापासून हात झटकले आहेत. राणा हा कॅनडाचा नागरिक आहे, त्याचा पाकिस्तानशी आता संबंध नाही, असं पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं. राणानं गेल्या दोन दशकांपासून त्याच्या पाकिस्तानशी संबंधित कागदपत्रांचं नूतनीकरण केलं नसल्याचा दावाही पाकिस्ताननं केला. राणाच्या चौकशीतून पाकिस्तानचा पर्दाफाश होईल, असं कायदेतज्ज्ञ बोलत आहेत. पण त्याआधीच पाकिस्ताननं राणापासून फारकत घेतल्याचं दिसून येतंय.

दरम्यान, तहव्वूर राणाला आझाद मैदानात सार्वजनिकरित्या फाशी द्या अशी मागणी शहीद तुकाराम ओंबळेंचे भाऊ एकनाथ ओंबळेंनी केली आहे. कसाबला फाशी देण्यास विलंब झाला, यावेळी तसं करू नका अशी मागणीही एकनाथ ओंबळे यांनी केली.

**कोण आहे तहव्वूर राणा?**

१९६१ मध्ये पाकिस्तानमध्ये जन्मलेल्या तहव्वूर राणाने सुरुवातीला पाकिस्तानी सैन्यात डॉक्टर म्हणून काम केले आणि नंतर १९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात तो कॅनडाला गेला. कॅनेडियन नागरिकत्व मिळाल्यानंतर, तो शिकागो येथे स्थायिक झाला. तिथे तो इमिग्रेशन कन्सल्टन्सीसह विविध व्यवसाय चालवत होता.

मुंबईमध्ये २००८ साली झालेल्या दहशतवादी हल्ल्याप्रकरणी तहव्वूर राणाला अमेरिकेत अटक करण्यात आली होती. या हल्ल्यात १६० हून अधिक लोक मारले गेले होते. प्रेषित मुहम्मदचे वादग्रस्त व्यंगचित्र प्रकाशित करणाऱ्या जिलँड्स-पोस्टेनवरील हल्ल्याच्या प्रयत्नाशीही त्याचा संबंध होता. राणावर १२ गुन्ह्यांचा आरोप होता, ज्यामध्ये अमेरिकन नागरिकांच्या हत्येला मदत करणे आणि प्रोत्साहन देणे यांचा समावेश होता.

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह उद्या रायगड दौऱ्यावर

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह शनिवारी रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते किल्ले रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देणार असून, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सुनील तटकरे यांच्या निवासस्थानी भोजनासाठीही थांबणार आहेत. या भेटीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे, कारण रायगडच्या पालकमंत्रिपदाचा रखडलेला तिढा सुटणार का, याबाबत उत्सुकता आहे.

रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावरून महायुतीत बराच काळ वाद सुरू आहे. शिवसेनेचे (शिंदे गट) मंत्री भरत गोगावले आणि राष्ट्रवादीचे सुनील तटकरे यांच्यात या पदावरून संघर्ष आहे. गोगावले यांनी पालकमंत्रिपदासाठी दावा केला असला, तरी तटकरे यांचा प्रभाव लक्षात घेता हा प्रश्न अनुत्तरित आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यापूर्वी रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्री निवडीला स्थगिती दिली होती. आता अमित शाह यांच्या दौऱ्यामुळे या तिढ्यावर तोडगा निघेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. शाह यांच्या दौऱ्याची तयारी जोरात सुरू आहे. ते सुनील तटकरे यांच्या घरी भोजनासाठी जाणार असल्याने शिंदे गटात अस्वस्थता पसरली आहे. सूत्रांनुसार, शाह हे महायुतीतील घटक पक्षांमध्ये समन्वय साधण्यासाठी मध्यस्थी करू शकतात. या भेटीत पालकमंत्रिपदाबाबत चर्चा होऊन निर्णय होण्याची शक्यता आहे.

# 38 हजार एसटी कर्मचाऱ्यांना अवघा 56% पगार मिळणार

## शासनाच्या घोषणेनंतर कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड मोठा आक्रोश

**गजानन तुपे**

**मुंबई दि. १०**

फुकटच्या योजना जाहीर करणाऱ्या शासनाचे पितळ आता उघडे पडले आहे. हे शब्द एसटी कर्मचाऱ्यांचे आहेत ज्यांना संपूर्ण पागर मिळाला नाही त्यांनी सरकराच्या नावाने खडाखडा बोटे मोजलेली आहे. एसटी महामंडळाला यंदा शासनाकडून मागणीच्या तुलनेत निम्माच निधी मिळाल्याने एसटी कर्मचाऱ्यांना मार्च महिन्याचे केवळ ५६ टक्केच वेतन मिळणार आहे. त्याबाबतची सूचना राज्यातील सर्व विभाग नियंत्रक कार्यालयांना देण्यात आली. पूर्ण वेतन मिळणार नसल्याने कामगार संघटना संतापल्या आहेत. विशेष म्हणजे शासनाच्या या निर्णयामुळे एसटी कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड आक्रोश निर्माण झालेला आहे. एसटीच्या कर्मचाऱ्यांना पगार देऊ शकत नसाल. तर फुकटच्या योजनाची खैरात का वाटली जाते? असा सवाल संपूर्ण एसटी कर्मचाऱ्यांकडून केला जात आहे. इतक्या कमी पगारात घर कसे चालवायचे. मुलांच्या शिक्षणाची फी, कर्जाचे हप्ते आई-वडिलांचे औषध पाणी कसे करायचे. असे सवाल आता एसटीतील कर्मचारी करू लागले आहेत.

**शासनाने थकबाकीचे पैसे दिले नाहीत**
**- प्रताप सरनाईक**

या सगळ्या प्रकरणावरून आता राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी प्रतिक्रिया दिली आहे. शासनाकडून एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी दर महिन्याला सवलत मूल्य प्रतिपूर्ती रक्कम दिली जाते. प्रत्येक महिन्यात मागणीप्रमाणे निधी मिळत नाही. त्यामुळे तूट वाढून पी. एफ. ग्रॅज्युअटी, बँक कर्ज, एल.आय.सी अशी साधारण २३ हजार ५०० कोटी रुपयांची देणी संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात होऊनसुद्धा महामंडाळाकडून संबंधित संस्थांकडे वर्ग केली गेली नाहीत. तर, मार्च महिन्याचा पगारही आता निम्माच मिळणार आहे. याचं खापर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी अर्थखात्यावर फोडलं आहे. अर्थखात्याकडून प्रतिपूर्तीचा निधी मिळत नसल्याची खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली. प्रताप सरनाईक म्हणाले, " एसटीची प्रवासी संख्या वाढली आहे. परंतु, अर्ध्या तिकिटाचे पैसे शासनाकडून प्रतिपूर्तीच्या माध्यमातून मिळतात. ते पैसे वेळेवर मिळाले पाहिजे. अर्थखात्याकडून आम्हाला कधीकधी वेळेवर पैसे मिळत नाहीत. अर्थखात्याचे प्रमुख अजित पवारांना विनंती केली आहे की अर्थखात्याकडून आम्हाला योग्य सहकार्य मिळाले पाहिजे.


**मागणी 925 कोटींची, दिले फक्त 273 कोटी**

यंदा महामंडळाने शासनाकडे मार्च महिन्याच्या वेतनासह इतर थकीत देण्यांसाठी ९२५ कोटींच्या निधीची मागणी केली होती. परंतु, २७२ कोटी ९६ लाख रुपये मिळाले. त्यातील ४० कोटी रुपये कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी महामंडळाने एसटी बँकेकडे वर्ग केले. त्यामुळे ८७ हजार कर्मचाऱ्यांना मार्च महिन्याच्या वेतनापैकी केवळ ५६ टक्केच निधी दिला जाणार आहे. शिल्लक वेतनाबाबत वरिष्ठांच्या आदेशानुसार कारवाई केली जाणार असल्याचे एसटी अधिकारी सांगत आहेत. मात्र ज्या पद्धतीने एसटीच्या कर्मचाऱ्यांमध्ये आक्रोश उसळला आहे. त्यासोबतच सध्या सुट्ट्यांच्या कालावधीतील वाढत्या प्रवाशांची संख्या पाहता यावरच लवकरच शासनाला तोडगा काढावा लागेल, असे दिसून येत आहे.

## महाराष्ट्र तापला, नंदुरबार ४५.३ अंश

**मुंबई, दि.१० प्रतिनिधी**

महाराष्ट्र सध्या प्रचंड तापलाय. तापमानाचा उद्रेक होत असून आता कमाल तापमान पन्नाशीकडे झेप घेत असल्याचे चित्र आहे. आज बहुतांश ठिकाणी कमाल तापमान ४० अंशांच्या वर गेलं आहे. हवामान विभागाच्या विशेष तापमान अंदाजानुसार, आज नंदूरबारमध्ये तापमानाचा पारा तब्बल ४५.३ अंशांवर स्थिरावला आहे. जळगाव, अकोल्यात ४३.७ अंशांची नोंद झाली आहे. संपूर्ण राज्यात उष्णतेचा दाह वाढला आहे. दरम्यान, विदर्भात पुन्हा एकदा अवकाळी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यात प्रचंड उष्ण आणि दमट हवामान राहणार आहे. महाराष्ट्रात सध्या विदर्भ वगळता उर्वरित संपूर्ण राज्यात तापमानाचा उच्चांक झाला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, विदर्भात पुढील चार दिवस वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे.




# जन्मदात्रीने जुळ्यांना पाण्याच्या टाकीत बुडवले

**पुणे, दि. १० प्रतिनिधी**

टेस्ट ट्युब बेबीकरिता मोठ्या प्रमाणावर खर्च करून दोन जुळी मुले झाली. मात्र, त्यांची वाढ योग्यरीत्या होत नसल्याच्या तणावापोटी आईने दोन महिन्यांच्या जुळ्या मुलांना छतावरील प्लास्टिकच्या पाण्याच्या टाकीत बुडवून जिवे मारले. त्यानंतर स्वत: आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. ही धक्कादायक घटना थेऊरमधील दत्तनगर भागातील काकडे वस्तीत मंगळवारी सकाळी पावणेसातच्या सुमारास घडली. याप्रकरणी या महिलेच्या भावाने लोणी काळभोर पोलिसांकडे फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी 35 वर्षांच्या महिलेवर खुनाचा गुन्हा दाखल करून तिला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या महिलेचा सांगली जिल्ह्यातील आष्टा येथे राहणाऱ्या एका व्यक्तीसोबत विवाह झाला आहे. तिचे पती बँकेत नोकरी करतात. विवाहाच्या 10 वर्षांनंतरही त्यांना मुल होत नसल्याने त्यांनी मोठा खर्च करून टेस्ट ट्युब बेबीचा पर्याय निवडला. त्यामुळे गेल्या एक वर्षापासून त्या माहेरी दत्तनगर थेऊर येथे आल्या होत्या. टेस्ट ट्युब बेबीच्या माध्यमातून त्यांना दोन महिन्यांपूर्वी दोन जुळे मुले झाली. परंतु, त्यांची वाढ योग्यरीत्या होत नव्हती. या बाळंतपणात महिलाही खूप अशक्त झाली असून, त्यांना काही आजार झाला आहे.

मुलांची योग्य वाढ होत नसल्याने व त्याचा खर्च परवडत नसल्याने त्या तणावात होत्या. त्यातूनच त्या मंगळवारी सकाळी दोन्ही बाळांना घेऊन घराच्या छतावर गेल्या. त्यांनी छतावरील प्लास्टिकच्या टाकीमधील पाण्यात दोन्ही बाळांना बुडविले व स्वत: त्यात उडी घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार शेजारी राहणाऱ्या एका व्यक्तीने पाहिला. महिला पाण्यात बुडून वर येत होती. त्याने महिलेला आवाज दिला. परंतु काही झाले नाही. शेवटी त्या व्यक्तीने फोन करून ही माहिती महिलेच्या भावाला दिली. त्याने छतावर धाव घेतली.

त्या वेळी हा प्रकार समोर आला. नियंत्रण कक्षाला माहिती मिळताच, लोणीकाळभोर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. दोन्ही मुले आणि महिलेला बाहेर काढून येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, दोन्ही मुलांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या घटनेची माहिती मिळताच परिमंडळ पाचचे पोलिस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहायक आयुक्त अनुराधा उदमले, वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी या महिलेवर खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिस उपनिरीक्षक रत्नदीप बिराजदार तपास करीत आहेत. महिलेने दोन महिन्यांच्या दोन जुळ्या मुलांना पाण्याच्या टाकीत बुडवून ठार मारले. त्यानंतर स्वतःदेखील आत्महत्येचा प्रयत्न केला. पोलिसांनी महिलेला अटक केली असून, पुढील तपास सुरू असल्याचे लोणी काळभोर ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी सांगितले.

## भिसे कुटुंबाने एकनाथ शिंदेंची 5 लाखांची मदत नाकारली

**पुणे, दि. १० प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ईश्वरी भिसे यांच्या कुटुंबाला दिलेली ५ लाख रुपयांची आर्थिक मदत भिसे कुटुंबाने नाकारली आहे. ईश्वरी भिसे यांचे पती सुशांत भिसे यांनी ही रक्कम स्वीकारण्यास स्पष्ट नकार देत, "आम्हाला आर्थिक मदत नको, दोषींवर कठोर कारवाई हवी," अशी मागणी लावून धरली आहे. यापूर्वी भाजप नेते चंद्रकांत पाटील यांनी देऊ केलेली १ लाख रुपयांची मदतही या कुटुंबाने नाकारली होती. ईश्वरी भिसे यांच्या मृत्यू प्रकरणात कुटुंबाने सुरुवातीपासूनच आर्थिक मदतीपेक्षा न्यायाला प्राधान्य दिले आहे.

ईश्वरी भिसे यांच्या मृत्यूमुळे पुणे आणि राज्यभरात संतापाची लाट उसळली होती. या घटनेनंतर सुशांत भिसे यांनी सातत्याने दोषींवर कारवाईची मागणी केली आहे. ते म्हणाले, "पैशांनी आमचे नुकसान भरून निघणार नाही. आमच्या कुटुंबावर झालेल्या अन्यायाला कायदेशीर उत्तर हवे आहे. दोषींना कठोर शिक्षा झालीच पाहिजे." त्यांनी सरकार आणि प्रशासनाला या प्रकरणात त्वरित पावले उचलण्याचे आवाहन केले आहे.

एकनाथ शिंदे यांनी भिसे कुटुंबाला ५ लाखांची मदत जाहीर करत, दोषींवर कारवाईचे आश्वासन दिले होते. तत्पूर्वी चंद्रकांत पाटील यांनी १ लाखांची मदत देऊ केली होती, परंतु तीही कुटुंबाने स्वीकारली नव्हती. सुशांत भिसे यांनी तेव्हाही, "न्याय मिळेपर्यंत कोणतीही मदत नको," अशी ठाम भूमिका घेतली होती. या निर्णयाने कुटुंबाच्या न्याय मागणीला सामाजिक पाठिंबा मिळत असून, सरकारवर दबाव वाढला आहे.

या प्रकरणाने आरोग्य व्यवस्था आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. भिसे कुटुंबाच्या या नकारामुळे सरकारसमोर आता दोषींना तातडीने पकडून कायदेशीर कारवाई करण्याचे आव्हान आहे. पोलिसांनी तपास सुरू असल्याचे सांगितले असून, लवकरच दोषींना अटक होईल, असे आश्वासन दिले आहे. मात्र, कुटुंब आणि समर्थकांनी जोपर्यंत ठोस कारवाई होत नाही, तोपर्यंत आंदोलनाचा इशारा दिला आहे.

## देशमुख हत्याप्रकरणी वाल्मीक कराडचा कोर्टात अर्ज

**बीड, दि. ११ प्रतिनिधी**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची आजची सुनावणी संपली असून येत्या २४ तारखेला या प्रकरणी सुनावणी घेण्यात येणार आहे. आजच्या सुनावणीत सरकारी विशेष वकिलांकडून काही कागदपत्रे सादर करण्यात आली. त्यात देशमुखांच्या मारहाणीचा व्हिडिओ कोर्टात दिला आहे. परंतु हा व्हिडिओ बाहेर प्रसिद्ध होऊ नये, जर झाला तर त्यातून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो अशी विनंती संतोष देशमुखांच्या बाजूने युक्तिवाद करणारे ज्येष्ठ वकील उज्ज्वल निकम यांनी कोर्टात केली.

आजच्या सुनावणीबाबत उज्ज्वल निकम यांनी म्हटलं की, न्यायालयाने आरोपींना त्यांचे म्हणणं मांडायला सांगितले आहे. येत्या २४ एप्रिलला त्यावर सुनावणी होईल. आजच्या सुनावणीत आरोपी वाल्मीक कराडची चल-अचल संपत्ती जप्त करण्यात यावी असा अर्ज कोर्टात दिला आहे. त्यावर वाल्मीककडून खुलासा दाखल करण्यात आला नाही. त्यानंतर यावर रितसर सुनावणी होईल. वाल्मीक कराडने कोर्टात अर्ज दाखल केला असून मी खूनात नाही, खंडणी मागितली नाही. मी कसा निर्दोष आहे असा केविलवाणा प्रयत्न केला आहे असं दिसून येते असंही निकम यांनी सांगितले.

तसेच सीआयडीने काही महत्त्वाची कागदपत्रे गोळा केली आहे. कराडसोबत इतर आरोपींच्या संपत्तीची चौकशी सुरू आहे. पुढील तपास सुरू असल्याने पूर्ण तपास झाल्यानंतर संपत्तीबाबत निर्णय घेण्यात येईल. मकोका कायद्यातंर्गत कराडची संपत्ती जप्त करावी असा अर्ज आम्ही दिला आहे. कोर्टात पुरावे नोंदवले जातील असं निकम यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, आरोपी वाल्मीक कराडने कोर्टात अर्ज दाखल करून माझा या गुन्ह्याशी काही संबंध नाही त्यामुळे मला यातून मुक्त करावे अशी मागणी करणारा अर्ज आज कोर्टात दाखल केला. जेव्हा देशमुख यांची हत्या झाली, त्यांना बेदम मारहाण करण्यात आली. हा व्हिडिओ कोर्टाकडून सुरक्षित ठेवण्यात आला आहे या २ महत्त्वाच्या घटना सुनावणीत घडल्या आहेत.

## महत्त्वाचे

### माध्यमिक विद्यालय उंटवाडीस एन.एम.एम.एस. परीक्षेत यश

**एकलहरे ।** नाशिक एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमिक विद्यालय, उंटवाडी शाळेस शासनाच्या एन.एम.एम.एस. परीक्षेत उत्तम यश मिळाले आहे.




या परीक्षेस विद्यालयातून 50 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी इ 8 वी च्या सार्थक चितळे जिल्ह्यात खुल्या प्रवर्गात 135 वा क्रमांक प्रणव सदगीर एन टी सी प्रवर्गात 8 वा क्रमांक, साई वाघ एस टी प्रवर्गात 10 वा क्र. साई खेडाम एस टी प्रवर्गात 34 वा क्रमांक आला. या विद्यार्थ्यांना विद्यालयातील शिक्षक हेमंत भुसारे, रफिक इनामदार, सुमेधा कुलकर्णी, अबोली अकोलकर, शीतल मोरे यांनी मार्गदर्शन केले होते. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल संस्था उपाध्यक्ष तथा शालेय समिती अध्यक्ष चंद्रशेखर मोंढे, मुख्याध्यापक राजेंद्र कापसे, उपमुख्याध्यापक रविंद्र हात्ते, सूर्यभान जगताप, पर्यवेक्षिका मनिषा देशपांडे, शिक्षक प्रतिनिधी बाळासाहेब आहेर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शन करणाऱ्या गुरुजनांचे हार्दिक अभिनंदन केले व त्यांना शुभेच्या दिल्या.

### कपालेश्वर संस्थांच्या उत्पन्नात भरघोस वाढ

**नाशिक ।** श्री कपालेश्वर महादेव संस्थान वर नवीन विश्वस्त मंडळाची निवड झाल्यानंतर संस्थानाच्या उत्पन्नात सातत्याने वाढ होत आहे. आर्थिक वर्ष 2024-25 चे उत्पन्नात व नवीन विश्वस्त मंडळाची नेमणूक होण्याच्या अगोदरचे आर्थिक वर्ष 2022-23 च्या तुलनेत तब्बल चौपट वाढ झालेली आहे. मागील वर्षी देखील संस्थानाच्या उत्पन्नात दुपटीने वाढ झाली होती. यावेळी संस्थानाने देणगीचे सर्व उच्चांकही मोडीत काढले आहेत. संस्थानला 2022-23 या आर्थिक वर्षात 17 लाख 72 हजार 538 रुपये, 2023-24 मध्ये 33 लाख 31 हजार 571 रुपये आणि 2024-25 या आर्थिक वर्षात त 67 लाख 24 हजार 017 रुपये उत्पन्न मिळाले. सदरील 2024 25 च्या उत्पन्नात धर्मादाय उपआयुक्त यांच्या आदेशान्वये केलेल्या मुदत ठेवीच्या 14 लाख 27 हजार 490 या रकमेचा देखील समावेश केलेला आहे. संस्थांमध्ये वेगवेगळ्या माध्यमातून भाविकांमध्ये केलेल्या जनजागृतीमुळे भाविकांकडून देणगीचा ओघ वाढलेला आहे. वाढिव उत्पन्नातून भाविकांना विविध सोयी सुविधा पुरवणे संस्थांना सहज शक्य झाले आहे. हे दान सत्कारणी लागत असून, भाविकांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल भाविकांचे ऋणी आहे, असे मत संस्थाचे सचिव ॲड. अक्षय कलंत्री यांनी व्यक्त केले.

### 'संगीत वारी' या संगीत एकांकिकेचे अभिवाचन

**नाशिक ।** येथील अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, नाशिक शाखेच्यावतीने शुक्रवारी (दि. ११) संध्याकाळी ६ वाजता अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, सभागृह, कालिदास कलामंदिर, नाशिक येथे पूनम चौधरी पाटील लिखित, दिग्दर्शित "संगीत वारी" या संगीत एकांकिकेचे अभिवाचन आयोजित करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष प्रा.रवींद्र कदम यांनी दिली. या मासिक नाट्य अभिवाचन उपक्रमात पूनम चौधरी पाटील, नकुल चौधरी, निलेश जगदाळे, कौस्तुभ पांडे, दुर्वाक्षी पाटील, मुकुंद भारद्वाज आणि वैभव काळे हे अभिवाचक अभिवाचन करणार असून या अभिवाचनास संगीत वैभव काळे, वीरेंद्र काळे, नंदिता दीक्षित आणि गृप यांनी दिले आहे. अभिवाचनास नाट्यकर्मी तसेच नाट्यरसिक प्रेक्षकांनी अधिकाधिक संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन प्रमुख कार्यवाह सुनील ढगे यांनी केले आहे.

### हनुमान जयंतीनिमित्त वाहतूक मार्गात बदल

**नाशिक ।** शनिवारी (दि. १२) हनुमान जयंती आहे. त्या पार्श्वभूमीवर पंचवटी, जुने नाशिक परिसरातून पारंपारिक मिरवणूक निघते. या मिरवणुकीमुळे वाहतूक कोंडी होण्याची शक्यता असल्याने वाहतूक मार्गात बदल करण्यात आले आहे. हनुमान जन्मोत्सवानिमित्ताने शनिवारी दुपारी तीन वाजता चौक मंडईतील वझरे मारुती मंदिरापासून मिरवणुकीला प्रारंभ होणार आहे. मिरवणूक संपेपर्यंत मिरवणूक मार्गावर वाहतुकीला बंदी असणार आहे. मिरवणूक वझरे मारुती मंदिर (चौक मंडई) येथून प्रारंभ होईल. दूध बाजार, गाडगे महाराज पुतळा, मेन रोड, धुमाळ पॉईंट, रेड क्रॉस सिग्नल, एमजी रोड, अशोक स्तंभ, रविवार कारंजा, मालेगाव स्टँड, रामतीर्थ (पंचवटी) असा मिरवणुकीचा मार्ग आहे. मिरवणूक मार्गावरील रस्त्याच्या दोन्ही मार्गावरील वाहतुकीला बंदी असेल. हातगाड्या बैलगाड्यांसह सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद. बागवान पुरा पोलीस चौक ते अमरधाम रोड ते पंचवटी वाहने जातील येतील. सारडा सर्कल ते खडकाळी सिग्नल, मोडक सिग्नल, शालिमार, सीबीएस, कॅनरा कॉर्नर, जुना गंगापूर नाका मार्गे चोपडा लॉन्स, पंचवटीकडे वाहने येतील जातील. पंचवटी कारंजाकडून येणारी वाहतूक मखमलाबाद नाका चोपडा लॉन्स जुना गंगापूर नाकाकडे जातील येतील. सीबीएसकडून पंचवटीकडे जाणारी वाहतूक मेहर सिग्नल, अशोक स्तंभ, गुरांचा दवाखाना, घारपुरे घाट, रामवाडी पुलावरून मखमलाबाद नाकामार्गे पंचवटीकडे येतील जातील.

# भारतीय रेल्वेतील पुश-पुल तंत्रज्ञान म्हणजे आहे तरी काय!

पुश-पुल तंत्रज्ञान हे रेल्वे इंजिनच्या नवीन तंत्रज्ञानातील एक महत्त्वाचे पाऊल आहे. या प्रणाली मध्ये एकाच ट्रेनमध्ये दोन इंजिने असतात– एक पुढे (Pull) आणि एक मागे (Push). पुढच्या इंजिनला मास्टर इंजिन म्हणतात, आणि मागे असलेल्या इंजिनला सेलव्ह म्हणतात, दोन्ही इंजिने एकाच वेळी समन्वयित पद्धतीने कार्य करतात, ज्यामुळे ट्रेनला अधिक वेगाने आणि सहजतेने हलवता येते.






मध्य रेल्वेच्या नवी दिल्ली, मुंबई राजधानी एक्सप्रेसमध्ये आपल्याला पुष्पूल टेक्नॉलॉजी बघायला मिळते. राजधानी एक्सप्रेस ही गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (मुंबई) येथून सुटल्यानंतर कसारा घाटात बाकीच्या मेल/ एक्सप्रेस गाड्यां सारखे मागे बँकर लावण्याची आवश्यकता पडत नाही, राजधानी एक्सप्रेस अगदी सुसाट पणे थेट नाशिक रोड रेल्वे स्थानकावर थांबते.

**पुश-पुल तंत्रज्ञानाचे फायदे**

गती वाढते दोन इंजिनांमुळे ट्रेनला अधिक वेगाने चालवता येते. गतिमान प्रवास– ट्रेनचे उचलण्याचे आणि थांबण्याचे वेळ कमी होते. कमीत कमी वेळेत गंतव्य स्थाना पर्यंत पोहोचणे शक्य होते. ट्रॅकवरील लोड कमी होतो कारण वजनाची वाटणी दोन्ही इंजिनांमध्ये होते. जास्त डब्यांची वाहतूक शक्य मोठ्या लांबीच्या गाड्यांना सहजपणे ओढता येते. भारतीय रेल्वेतील वापर: भारतीय रेल्वेने काही एक्सप्रेस आणि सुपरफास्ट गाड्यां मध्ये हे तंत्रज्ञान वापरण्यास सुरुवात केली आहे. विशेषत: जिथे ट्रॅकवर वळणं जास्त आहेत किंवा जास्त चढ-उतार आहेत, अशा ठिकाणी हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरतं.

# फलक रेखाटनातून भगवान महावीर यांना अभिवादन






**नाशिक ।** महावीर जयंती जैन धर्माचे 24 वे तीर्थंकर भगवान महावीर जयंती निमित्त शिक्षण मंडळ भगूर संचालित नूतन माध्यामिक विद्यालय भाटगाव, ता. चांदवड, येथील कला शिक्षक देव हिरे यांनी फलक रेखाटन करून अभिवादन केले आहे.

जैन धर्माचे 24 वे तीर्थंकर भगवान महावीर अहिंसेचे मूर्तीमंत प्रतिक होते. बिहार मधील मुजफ्फरपुर जिल्ह्यात (पूर्वीचे वैशाली राज्य) कुंडलपूर येथे इसवी सन पूर्व 599 मध्ये त्यांचा जन्म झाला. वयाच्या तिसाव्या वर्षी त्यांनी श्रावणी दीक्षा घेतली बारा वर्षे त्यांनी मौन पाळले. त्यांना केवलज्ञान प्राप्त झाले. त्यानंतर जनकल्याणासाठी त्यांनी उपदेश देण्यास सुरुवात केली. त्यासाठी त्याकाळी प्रचलित अर्ध मागधी भाषेचा त्यांनी आधार घेतला. त्यांनी जैन धर्माच्या अहिंसा, सत्य , अस्तेय, अपरिग्रह व ब्रह्मचर्य स्वीकार केले. त्याग, संयम, प्रेम करुणा, शील व सदाचार हे त्यांच्या प्रवचनाचे सार आहे. चतुरविध संघाची स्थापना करुन समता हेच जीवनाचे लक्ष आहे असे सांगून भगवान महावीरांनी या संदेशाचा प्रसार केला. भगवान महावीर यांना जयंती निमित्त रंगीत खडू माध्यमातील फलक रेखाटनातून विनम्र अभिवादन!

**– फलक रेखाटन– देव हिरे.**
**(कलाशिक्षक, शिक्षण मंडळ भगूर, संचालित नूतन माध्यमिक विद्यालय भाटगाव. ता.चांदवड.जि.नाशिक.)**

### तळागाळातील जनतेशी नाळ जुळून ठेवणारा समाजरत्न- सुनील कांबळे



**एकलहरे ।** सामाजिक कार्य करण्याची आवड व वंचित घटक, दीनदुबळे, गरीब, कस्टकरी, कामगार यांच्यासाठी गेल्या ४५ वर्षांपासून आंबेडकर चळवळीत व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन सामाजिक कार्याचा संकल्प करून पँथर स्टाइलने नाशिक जिल्हा व परिसरात सर्वसामान्यांसाठी काम करत असलेले सामाजिक कार्यकर्ते सुनील कांबळे हे समाजमनाचा आरसा म्हणून काम करीत आहे. आरपीआय (आठवले गट) चे उत्तर महाराष्ट्र कार्याध्यक्ष म्हणून काम केलेले आहे. सन २००० मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर नाशिक रोड सार्वजनिक उत्सव समितीचे अध्यक्षपद भूषविलेले आहे. सामाजिक कार्याबद्दल वेगवेगळ्या संस्थांनी पुरस्कार देऊन गौरव केला आहे. सन २००९ मध्ये दलित ऐक्य आघाडीतर्फे देवळाली मतदारसंघात विधानसभा निवडणूक लढवून जोरदार संघर्ष केला. सन २००७ मध्ये नाशिक रोडमधील सिन्नरफाटा येथून महापालिका निवडणूक सर्वसाधारण गटातून लढवून संघर्ष केला. गेल्या अनेक वर्षांपासून डॉ. आंबेडकर जयंतीचेअध्यक्षपद निवड समितीत प्रमुख म्हणून व आंबेडकरी जनतेच्या विचाराने दरवर्षी अध्यक्षपदासाठी नाव जाहीर करण्याचा मान कांबळे यांना मिळाला. अनेक पुरस्कार त्यात रमाई माता, जीवन गौरव राजश्री शाहू महाराज असे बरेच पुरस्कार कांबळे यांना मिळाले नाशिक रोडमध्ये अनेक सामाजिक कामे सर्वधर्मसमभाव, सर्व धर्मांचा आदर करून, तसेच मोठ्या उत्साहात सर्व सण, जयंती व महोत्सव परिसरातील नागरिकांसोबत साजरे करून सामाजिक एकोपा साधण्याचा कटाक्षाने ते प्रयत्न करतात. गोरगरिबांना ब्लँकेट ,शिधा, मुलांना वह्या पुस्तके असे कार्य ते सतत करत आहेत. समाजकार्य करताना पँथर स्टाइलनेच केले जाते. जेथे अन्याय होतो तेथे पँथर स्टाइलने न्याय मिळवून दिला जातो, हे ब्रीद त्यांनी मनावर कोरले आहे. आजही त्यांच्यातील पँथर तेवढाच जागृत व कार्यशील आहे. त्यामुळे समाज सोबत आहे, समाजरत्न हे शोभेल असे सतत कुठल्याही कार्यात समाज असो वा नसो सर्व गोर गरीब लोकांची सेवा हाच ध्यास मनात ठेवणारा खरा माणुसकी जिवंत ठेवणारा एक मवाळ नेता सुनील कांबळे हे आहेत.

# जे. टी. कासलीवाल इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये महावीर जयंती साजरी






**नांदगाव ।** नांदगाव येथील जे.टी. कासलीवाल इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये महावीर जयंती मोठ्या उत्साहात श्रद्धेने साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाची सुरुवात श्री मनी चावला यांच्या उपस्थितीत भगवान महावीर यांच्या प्रतिमा पूजनाने स्तुतीने करण्यात आली.

यानिमित्ताने शाळेत विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी भगवान महावीर यांच्या जीवनावरील माहिती सादर केली. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी सकल जैन बांधवांसोबत या ठिकाणी ज्ञ नमस्कार महामंत्र्याचा जप केला. तसेच शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अहिंसा, सत्य आणि करुणा या मूल्यांबद्दल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी रंगमंच गाणी सांस्कृतिक कार्यक्रमांमध्येही सक्रिय सहभाग घेतला. ज्यामुळे वातावरण उत्साहाने भरले होते. या कार्यक्रमास शाळेतील शिक्षण, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

सर्व विद्यार्थ्यांना संस्थेचे चेअरमन मा. श्री सुनील कुमारजी कासलीवाल तसेच सेक्रेटरी विजय चोपडा, प्रमिलाताई कासलीवाल, सुशील कासलीवाल, निखबचंद कासलीवाल, जुगल किशोर अग्रवाल, महेंद्र चांदिवाल, प्रिन्सिपल मणी चावला, मुख्याध्यापक शरद पवार, विशाल सावंत, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी महावीर जयंती निमित्त शुभेच्छा दिल्या.

# संत नामदेव महाराज सार्वजनिक वृत्तपत्र वाचनालयाचा प्रारंभ



**नाशिक ।** सध्याच्या मोबाईल युगात वाचनाची आवड कमी होत चालली आहे.वाचनातून व्यक्तीच्या ज्ञानात भर पडत असते. वाचनामुळे जीवनाला दिशा मिळते व वाचन संस्कृती वाढल्यानंतर समाजाची सुधारणा होऊन सुसंस्कृत पिढी तयार होते. म्हणून वाचन संस्कृती वाढण्यासाठी वाचनालयांची समाजाला गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ नागरिक गुलाबराव खैरनार यांनी केले.

सिडको येथील कै. भिकन कृपाराम जगताप बहुउद्देशीय संस्था संचलित संत नामदेव महाराज सार्वजनिक वृत्तपत्र वाचनालयाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. रामनवमीच्या शुभमुर्तावर गुलाब खैरनार यांच्या हस्ते संत नामदेव महाराज सार्वजनिक वृत्तपत्र वाचनालयाचे उदघाटन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष नंदलाल जगताप यांनी प्रास्ताविक केले. प्रास्ताविक नंदलाल जगताप यांनी वाचनालय सुरु करण्याचा उद्देश स्पष्ट केला. पुस्तकांसारखा सारखा दुसरा गुरु नाही, असे त्यामुळेच म्हटले जाते. वाचनाची आवड असणारे वाचक सर्व प्रकारची पुस्तके किंवा वर्तमानपत्रे विकत घेऊन वाचू शकत नाहीत. अशावेळी त्यांची वाचनाची भूक या वाचनालयाच्या माध्यमातून भागवली जाणार आहे. अनेक यशस्वी झालेल्या व्यक्तींच्या जीवनात झालेला सकारात्मक बदल हा केवळ चांगले वाचन केल्यामुळे झालेला आहे. त्यामुळे समाजाची जडणघडण चांगली व्हावी, सध्याच्या पिढीला वाचनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने आम्ही हे वाचनालय सुरु केले असल्याचे नंदलाल जगताप यांनी सांगितले. याप्रसंगी जाधव, बाळासाहेब गायकवाड, बाळू खोडके, उल्हास सांगळे, मधुकर संन्याशिव, समाजबांधव उपस्थित होते.

# सावरगाव श्री संगमेश्वर महादेव ट्रस्ट परिसरात स्वच्छता मोहीम

## मुक्त विद्यापीठ, दुलाजी नाना पाटील कृषी महाविद्यालयाचा संयुक्त उपक्रम

**नाशिक ।** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ व दुलाजी नाना पाटील कृषी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने गंगापूर धरणाजवळील सावरगाव येथील श्री संगमेश्वर महादेव ट्रस्ट (तालुका व जिल्हा नाशिक) या निसर्गरम्य ठिकाणी पर्यावरण संवर्धन-स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

विद्यापीठातील विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्र, ग्रामीण विकास व उद्योजकता विद्याशाखा व राष्ट्रीय सेवा योजना यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले. प्रमुख अतिथी म्हणून कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्या डॉ. संजीवनी महाले, कुलसचिव दिलीप भरड, वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, जनसंपर्क अधिकारी महेंद्र बनसोडे, संगमेश्वर महादेव ट्रस्टचे अध्यक्ष नामदेव गोतरणे, महादेवपूरच्या माजी सरपंच श्रीमती ज्योती भागवत, ट्रस्टचे पुजारी ह.भ.प. संजय सूर्यवंशी, ॲड. स्वप्नील गोतरणे, दुलाजी नाना पाटील कृषी महाविद्यालयाचे रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप सूर्यवंशी, प्रा. कैलास भोईर यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी बोलतांना कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की, मागील पिढीने जतन – संवर्धन केलेल्या निसर्गाच्या सान्निध्यात आपण राहत आहोत, त्याचा लाभ घेत आहोत. आता त्याचप्रकारे आपली नैतिक जबादारी म्हणून भावी पिढीसाठी आपल्याला हा निसर्ग अधिक चांगल्या प्रकारे जतन व संवर्धित करायचा आहे. निसर्गाचा ऱ्हास रोखण्यासाठी परिसर स्वच्छता हा त्यातील पहिला टप्पा आहे. दुसऱ्या टप्प्यात आगामी पावसाळापूर्वी श्री. संगमेश्वर महादेव ट्रस्ट परिसरात विद्यापीठातर्फे १०१ देशीरोपांचे वृक्षारोपण करण्यात येईल असेही त्यांनी जाहीर केले. श्री संगमेश्वर महादेव ट्रस्टचे पुजारी ह.भ.प. संजय सूर्यवंशी यांनीही मार्गदर्शन केले. कुलसचिव दिलीप भरड यांनी विद्यार्थ्यांसह उपस्थितांना पर्यावरण रक्षण व संवर्धन बाबत शपथ दिली. त्यानंतर परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात येवून कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली. यानिमित्ताने प्रातिनिधिक स्वरूपात वृक्षारोपण देखील करण्यात आले.





विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्राचे प्रमुख डॉ. दयाराम पवार यांनी प्रास्ताविक तर सूत्रसंचलन विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक श्री. राजेंद्र वाघ यांनी केले. ग्रामीण विकास व उद्योजकता विद्याशाखेचे प्रा. कैलास मोरे यांनी आभारप्रदर्शन केले. सिद्धांत टाक, केशव चौधरी, मंगेश पवार, गणेश उमाळे व माणिक गांगुर्डे यांनी परिश्रम घेतले.

## महत्त्वाचे

### सावरकर स्मारकास झाडांच्या कुंड्या भेट

**देवळाली कॅम्प ।** पर्यावरण संवर्धन व स्वच्छता मोहिमेला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र ग्रामीण बँक भगुर शाखेने अनोखा उपक्रम राबवला शाखा व्यवस्थापक उषा चव्हाण आणि रिजनल अधिकारी कुलकर्णी यांच्या पुढाकाराने भगूर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारकास बारा झाडांच्या कुंड्यांची भेट देण्यात आली. स्मारकाचे व्यवस्थापक भूषण कापसे यांनी या भेटीचे स्वागत केले व स्मारक परिसर हरित करण्यासाठी बँकेच्या प्रयत्नांचे कौतुक केले. उपक्रम स्मारक परिसराच्या सौंदर्यात भर घालण्यासोबतच पर्यावरण संरक्षणासाठी प्रेरणादायी ठरत आहे. या कार्यक्रमात नगरपालिकेचे मुख्याधिकारी सचिन कुमार पटेल, एकनाथराव शेटे बँकेचे कर्मचारी मंदार साखरे, भूषण तपासे, सुमित देशमुख, स्मारक सह व्यवस्थापक आकाश नेहेरे, खंडू रामगडे, कैलास भोर, प्रशांत कापसे उपस्थित होते. सामाजिक बांधिलकीची भावना जपणाऱ्या उपक्रमाबद्दल भगूर पुत्र स्वातंत्र्यवीर सावरकर समूहातर्फे मनोज कुवर दीपक गायकवाड, सौरभ कुलकर्णी, संभाजी देशमुख, भाऊसाहेब ससाने यांनी बँकेचे अभिनंदन केले आहे.

### शासकीय कामकाजात अडथळा गुन्हा दाखल

**नासिक रोड ।** शासकीय कामकाजात अडथळा आणलेल्या प्रकरणी देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. त्यांच्या गाडीत लाकडी दांडकेही सापडले आहे. पोलीस उपनिरीक्षक प्रवीण देवरे हे दि.५ एप्रिलला न्यायालयाच्या कामासंदर्भात दुचाकीवरून जात होते. त्यांना लॅम रोडवर महिला व कारचालक यांच्यात वाद सुरू असल्याचे दिसले. देवरे यांनी दोघांना पोलीस ठाण्यात तक्रार देण्यास सांगितले. कालचालक मिलन अशोक हरक (३२, राहणार देवळाली कॅम्प) आणि उत्कर्ष मधुकर मुरकुटे (२८, राहणार सौभाग्य नगर नाशिक रोड) यांना कार थांबवली म्हणून त्यांचा राग आला. त्यांनी प्रवीण देवरे यांच्यापाशी वादविवाद घातला. शासकीय कामात अडथळा आणला. पोलिसांनी त्यांच्या कारची तपासणी केली असता त्यात लाकडी दांडके मिळाला. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### भाडेतत्त्वावरील व्यावसायिक गाळयांच्या दरात शिथिलता

**नाशिक ।** महापालिकेने नवीन आर्थिक वर्षापासून व्यावसायिक गाळ्यावर आकारलेली तिप्पट भाडेवाडीच्या दरात शिथिलता दिली असून, नवीन रेडीरेकरणर दरानुसार दर निश्चिती करण्यात आले आहे. महापालिकेच्या शिथिलतेच्या धोरणामुळे व्यावसायिकांना आर्थिक सवलत मिळणार आहे. त्या व्यतिरिक्त महापालिकेला भाडेकरूंची माहिती देखील मिळणार आहे. एप्रिल २०१८ पासून निवासी दुप्पट तर वाणिज्य वापरासाठी तिप्पट दरवाढ करण्यात आली होती. भाडेतत्त्वावर गाळे दिल्यास १५८.४ चौरस मीटर दर करण्यात आला होता. व्यवसायिक तसेच बांधकाम व्यावसायिक संघटनांनी महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांची भेट घेऊन दर कमी करण्याची मागणी केली होती. त्यानुसार महापालिकेकडून दरात शिथिलता देण्यात आली आहे एक हजार चौरस फूट भाडे तत्त्वावरील गाड्यांसाठी ६८ रुपये प्रति चौरस मीटर याप्रमाणे मूल्यांकन दर गृहीत धरून ५७ हजार १६४ रुपये घरपट्टी अदा करावी लागेल.

### डॉ. तानाजी चव्हाण यांची प्रतिनियुक्ती शासनाकडून रद्द

**नाशिक ।** महात्मा नगर येथील डॉ. पंड्या रुग्णालय तसेच रुग्णालयांना नूतनीकरण परवाना न देणे या विषयामुळे चर्चेत आलेले महापालिकेचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. तानाजी चव्हाण यांची महापालिकेतील प्रतिनियुक्ती रद्द करण्यात आली असून, सहाय्यक वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत शेटे यांच्यावर कार्यवाही करण्याच्या सूचना राज्य शासनाने उपसचिव दि. नी. केंद्रे यांनी नगरविकास विभागाला दिले. गेल्या वर्षी डॉ. पंड्या रुग्णालयात पिंपळद येथील एक गर्भवती महिला उपचारासाठी दाखल झाली. उपचार घेताना तिचा मृत्यू झाला. पिढी त्याच्या पतीने या संदर्भात तक्रार केल्यानंतर माता मृत्यू संशोधन समितीने रुग्णालयाची पाहणी केली. त्यात गर्भपातासाठी वापरली जाणारी औषधे आढळली. तसेच रुग्णालयाच्या तपासणीत 2009 पासून रुग्णालयाला परवानगी नसल्याचे आढळले. रुग्णालयावर कार्यवाही करताना डॉ. पंड्या हॉस्पिटलला वाचविण्याचा प्रयत्न झाल्याचा संशय व्यक्त करताना आमदार डॉ. मनीषा कायंदे यांनी विधान परिषदेत लक्षवेधी मांडली. त्यानंतर आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी डॉ. चव्हाण व डॉ. शेटे यांची बदली करून चौकशी करण्याच्या सूचना दिल्या. उपसचिव केंद्रे यांनी डॉ. चव्हाण यांची प्रतिनियुक्ती रद्द केली असून, त्यांना संदर्भ रुग्णालयात हजर होण्याच्या सूचना दिल्या. डॉ. शेटे यांच्यावर कारवाईच्या सूचना दिल्या. दरम्यान मलेरिया विभागाचे प्रमुख डॉक्टर नितीन रावते यांच्याकडे आरोग्य विभागाचा पदभार दिला जाणार आहे.

# वादग्रस्त कारभारामुळे त्र्यंबक नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी वलयांकित

## एकाच ठेकेदारामुळे कोट्यवधींची कामे संशयाच्या भोवऱ्यात; बदलीसाठी ग्रामस्थ एकवटले

**नाशिक ।** आपल्या वादग्रस्त कारभारामुळे त्र्यंबक नगर परिषदेच्या (अ) कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी श्रीया देवचक्के चर्चेत आल्या असून, त्रंबकमधील भूमाफियांची वाढती अतिक्रमणे, धनदांडग्यांच्या कामांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष तसेच नगर परिषदेची कोट्यवधी कामे विशिष्ट ठेकेदाराच्या घशात जात असल्याने देवचक्के यांच्या कार्यपद्धतीवर संशय व्यक्त केला जात आहे.






मुख्याधिकारीपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर सुरुवातीच्या काळात कर्तव्यकठोर भूमिका घेणाऱ्या देवचक्के या प्रशासकीय कामकाजात सपशेल अपयशी ठरल्याचा आरोप करत त्यांची तात्काळ बदली करण्याची मागणी त्र्यंबककरांनी लावून धरली आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वरमध्ये सुरू असलेली कोट्यवधींची कामे मर्जीतील ठेकेदाराला दिल्याने मुख्याधिकाऱ्यांच्या हेतूविषयि संशय व्यक्त केला जात आहे. त्र्यंबकेश्वर नगर परिषदेत मनमानी पद्धतीने कारभार केल्यामुळे तत्कालीन मुख्याधिकारी प्रकाश जाधव यांची शासनाने उचलबांगडी केली होती. त्यानंतर श्रीया देवचक्के यांनी मुख्याधिकारीपदाचा कार्यभार स्वीकारला. मुख्याधिकारी बदलल्याने त्रंबक नगरीत काहीतरी सुधारणा होतील, अतिक्रमणे काढले जातील, शहरवासीयांसाठी उपयुक्त असलेल्या कामांचा दर्जा सुधारेल, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा असताना त्या अल्पावधीतच फोल ठरल्याचे दिसून आले. अलीकडच्या काळात त्याचा प्रत्यय आल्याचे दिसून येते. त्र्यंबक शहरातील अतिक्रमणाचा मुद्दा अतिशय गंभीर असताना त्याकडे देवचक्के यांचे दुर्लक्ष होत असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. वाढत्या अतिक्रमणामुळे त्रंबक शहर अगदी बकाल झाले असून, कुंभमेळ्याच्या दृष्टीने ही अत्यंत गंभीर बाब आहे. त्यामुळे वाढलेले अतिक्रमण तात्काळ हटविण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहे. मात्र निर्ढावलेल्या अधिकाऱ्यांनी न्यायालयाला सुद्धा फाट्यावर मारले आहे. या प्रकरणात पुन्हा अवमान याचिका देखील दाखल करण्यात आली; परंतु नगर परिषदेकडून त्याला दाद दिली जात नसल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे.

त्र्यंबकेश्वर नगर पालिकेतील नगर रचना, बांधकाम आणि अतिक्रमण विभाग गेल्या काही दिवसांपासून निद्रिस्त अवस्थेत असल्याने भूमाफियांनी त्र्यंबकच्या निसर्ग सौंदर्याला गालबोट लावले आहे. भूमाफियांकडे लक्ष न दिल्याने काही वर्षांपूर्वी थेट ब्रह्मगिरीला सुरुंग लावण्याचे धाडस त्यांनी केले होते. याप्रकरणी मोठा गाजावाजा झाला; मात्र अल्पावधीतच या प्रकरणावर पडदा पडला. त्यानंतरही भूमाफियांनी ब्रह्मगिरीच्या पायथ्याशी आपले हातपाय पसरले असून, त्याकडे नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांचे लक्षच नसल्याचे खुद्द मंत्री गिरीश महाजन यांनी स्पष्ट केले. एकीकडे नगरपरिषदेचे कोट्यवधी रुपयांचे काम सुरू असताना दुसरीकडे मात्र बेकायदेशीर बांधकामांकडे अधिकाऱ्यांचे लक्ष नसल्याचे स्पष्ट झाले आहे. अहिल्या तलावाच्या मागच्या बाजूस लोकवस्ती नसतानाही त्या भागात जाणीवपूर्वक रस्ते व इतर सुविधा पुरविल्या जात आहेत. या कामांना यापूर्वीही ग्रामस्थांनी मोठा विरोध केला होता. मात्र हा विरोध डावलून नगर परिषदेकडून कामकाज केले जात आहे. या भागात काही धनदानग्यांच्या जमिनी असून त्या जमिनींचा वाणिज्य वापर व्हावा त्या दृष्टीनेच नगरपरिषदेकडून कामे केली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

धार्मिक आणि नैसर्गिक दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या त्र्यंबक नगरीत आगामी कुंभमेळ्याच्या दृष्टीने कोट्यवधी रुपयांची कामे सुरू आहेत. ही कामे मर्जीतील एका खास ठेकेदारालाच दिली जात असून, त्यामध्ये मुख्याधिकाऱ्यांच्या एका जवळच्या नातलगाचा अप्रत्यक्ष सहभाग असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून होत आहे. त्र्यंबक शहरात सुरू असलेली कामे हादेखील वादाचा मुद्दा असून या ठेकेदाराशी कुणाची पार्टनरशिप आहे, याबाबत उलटसुलट चर्चा सुरू आहे. मुख्याधिकाऱ्यांकडून धनदांडग्यांच्या बेकायदेशीर कामांकडे सोयीस्कररीत्या दुर्लक्ष केले जात आहे तर सर्वसामान्यांच्या मुळावर घाव घातले जात आहे. शासकीय योजनांमध्ये देखील गैरव्यवहार झाल्याचे बोलले जाते. "माझी वसुंधरा" या योजनेत देखील भ्रष्टाचार झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे मुख्याधिकारी यांच्या कार्यकाळात झालेल्या सर्वच कामांची तसेच संबंधित ठेकेदार आणि त्याला मदत करणाऱ्यांची सखोल चौकशी करून गुन्हे दाखल करण्याची मागणी केली जात आहे.

अशा अनेक कारणांमुळे त्र्यंबकच्या (अ) कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी वादाच्या भोवऱ्यात सापडल्या असून, त्यांची बदली नव्हे तर हकालपट्टी करण्याची मागणी त्रंबकरांनी केली आहे.

# टॅक्स प्रॅक्टिशनर असोसिएशनच्या अध्यक्षपदी नितीन फिरोदिया

## वार्षिक सर्वसाधारण सभेत कार्यकारिणीची एकमताने निवड




**नाशिक ।** टॅक्स प्रॅक्टिशनर असोसिएशन नाशिक यांची बारावी वार्षिक सर्वसाधारण सभा हॉटेल व्हेज अरोमा येथील सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. असोसिएशनच्या अध्यक्षपदी नितीन फिरोदिया यांच्यासह कार्यकारिणीची एकमताने निवड करण्यात आली. कार्यकारणीमध्ये उपाध्यक्षपदी ॲड. प्रकाश विसपुते, सचिवपदी संदीप गाढवे यांची सर्वानुमते निवड केली आहे.

सभेच्या सुरुवातीला टॅक्स प्रॅक्टिशनर असोसिएशनमधील दिवंगत सभासद व कुटुंबीयांना श्रद्धांजली अर्पण करून सभेच्या कामकाजास सुरुवात झाली. मागील वर्षी सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तास सर्वांनी अनुमती देऊन कायम केले. यावेळी मागील वर्षातील संस्थेच्या कामकाजाचा आढावा मावळते अध्यक्ष अक्षय सोनजे यांनी सभासदांसमोर सादर केला. यानंतर पदाधिकारी निवड करण्यात आली. मावळते अध्यक्ष अक्षय सोनजे यांनी आपला पदभार नवनिर्वाचित अध्यक्ष नितीन फिरोदिया यांच्याकडे सोपवला. यानंतर नितीन फिरोदिया यांनी आगामी वर्षभरात राबविल्या जाणार्या उपक्रमांची माहिती दिली. सदस्यांसाठी विविध उपक्रम राबविले जाणार असल्याचे त्यांनी नमूद केले. सूत्रसंचालन जयप्रकाश गिरासे यांनी केले.

**टॅक्स प्रॅक्टिशनर असोसिएशन अर्थात कर सल्लागार संघटना नाशिकची कार्यकारणी अशी**– नितीन फिरोदिया (अध्यक्ष), प्रकाश विसपुते (उपाध्यक्ष), संदीप गाढवे (सचिव), मनोज धाडीवाल (खजिनदार), निखिल देशमुख (सहसचिव), रवी चोपडा (संघटक), तसेच कार्यकारणी सदस्यपदी अनिकेत कुलकर्णी, सचिन येवलेकर, प्रशांत उशीर, समाधान अपसुंदे, श्रीकांत चंद्रात्रे, अर्चना चंद्रात्रे, योगेश क्षत्रिय यांचा समावेश आहे.

# श्री आदियोगी फाऊंडेशन संस्थेतर्फे सिंहस्थ कुंभमेळा संदर्भात जनजागृती

## गोदघाटावरील भाविक, नागरिकांना पत्रक वाटप



**नाशिक ।** दर बारा वर्षांनी नाशिकला होणारा सिंहस्थ कुंभमेळा ही धार्मिक व सांस्कृतिक पर्वणीच असते. नाशिककर म्हणून सिंहस्थ कुंभमेळा आयोजनात आपलाही खारीचा वाटा असावा, या हेतूने श्री आदियोगी फाऊंडेशन, नाशिक या सामाजिक संस्थेने गुढीपाडव्याचा मुहूर्त साधुन नाशिकच्या गंगाघाटावरून जनजागृती अभियानाचे पत्र भाविकांना वाटप करून सुरूवात केली.

फाऊंडेशनचे सचिव नितीन पाटील यांच्या संकल्पनेतून गुढीपाडवा व मराठी नववर्षाचे औचित्य साधून शुभेच्छा पत्र तयार करून त्याचे वाटप गंगाघाटावर आलेल्या भाविक, पर्यटक व स्थानिक नागरिकांना करण्यात आले. या शुभेच्छा पत्रात त्र्यंबकेश्वर-नाशिकचे धार्मिक तथा पौराणिक महत्व, हरित कुंभाची गरज, पर्यावरणाचे रक्षण आदी बाबींचा उल्लेख करून सिंहस्थरुपी शिवधनुष्य सर्वांनी मिळून उचलण्यासाठी सज्ज होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. येत्या दोन वर्षात सिंहस्थ कुंभमेळ्यानिमित्त फाऊंडेशन मार्फत विविध स्पर्धा व उपक्रम आयोजित करून जनजागृती अभियान राबविणार असल्याचे नितीन पाटील यांनी सांगितले. उपक्रम यशस्वीते साठी फाऊंडेशनच्या मनिषा बोरसे-पाटील, संदीप नागरे, अनिता अहिरे, भारती जाधव, रेखा बागुल, जयश्री मोरे व ओम खैरनार आदीनी विशेष परिश्रम घेतले.

# शस्त्राचा धाक दाखवत खंडणी उकळणारे सराईत गुन्हेगार जेरबंद

नाशिक | गेल्या आठवड्यात भर दिवसा बंदुकीचा धाक दाखवत व्यापाऱ्याकडून १ कोटी रुपयांची खंडणी मागणाऱ्या सराईत गुन्हेगारांना जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले आहे. गुन्हे शाखा युनिट १ च्या पथकाने तांत्रिक विश्लेषणाद्वारे अवघ्या ४ दिवसांत सराईत गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्याने पोलिसांचे कौतुक केले जात आहे.त्यांच्याकडून जवळपास तीन लाखाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. भरदिवसा अपहरण करत खंडणी मागण्याच्या प्रकारामुळे शहरात एकच खळबळ उडाली होती.





## गुन्हे शाखा युनिट एकची यशस्वी कामगिरी

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार गेल्या आठवड्यातील गुरुवारी भर दिवसा सव्वा तीन वाजेच्या सुमारास काठी गल्ली सिग्नल येथे निखिल दर्यानाणी या व्यापाऱ्याचे तीन जणांनी अपहरण करत बंदुकीचा धाक दाखवून जिवंत सोडण्यासाठी तब्बल एक कोटी रुपयांची खंडणी मागितली. त्यापैकी १५ लाख रुपये रोख रक्कम हातात पडल्यानंतर आरोपींनी दर्यानाणी यांना सोडून दिले. त्यानंतर दर्यानाणी यांनी मुंबई नाका पोलीस ठाण्यात झालेल्या प्रकाराबाबत फिर्याद दाखल केली. या प्रकरणाची पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी गांभीर्याने दखल घेत गुन्हे शाखा युनिट एकचे पोलीस निरीक्षक मधुकर कड यांना तपासाच्या सूचना दिल्या. त्यानंतर कड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सीसीटीव्ही फुटेच्या सहाय्याने दिवसरात्र परिश्रम घेत गुन्हेगारांची नावे निष्पन्न करून अवघ्या चार दिवसात त्यांना जेरबंद केले. पथकातील पोलीस अमलदार राहुल पालखेडे यांना खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीनुसार क्षणाचा ही विलंब न करता सापळा रचत विल्होळी भागात लपून बसलेल्या मोहम्मद अन्वर सय्यद (वय 30) रा. नानावली, सादिक लतीफ सय्यद (वय ३९ ) राहणार लेखा नगर यांना ताब्यात घेतले. तर पोलीस हवालदार महेश साळुंके व आप्पा पानवळ यांना खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीनुसार पथक तयार करून अल्फरान अश्फाक शेख (वय २५) रा. चौक मंडई भद्रकाली, अहमद रहीम शेख (वय २५) रा. वडाळा गाव या दोघांना अटक केली. अटक झालेले सर्वच सराईत गुन्हेगार असून, त्यांच्याकडून जवळपास तीन लाख रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. हे दोघेजण अपहृत दर्यानाणी यांच्या भावाच्या दुकानात काम करीत होते. त्यांनीच फिर्यादीबद्दल सर्व माहिती पुरवली. या घटनेत कुठलेही सबळ पुरावे उपलब्ध नसताना देखील अत्यंत अल्पकाळात गुन्ह्याची उकल केल्याबद्दल पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी गुन्हे शाखा युनिट एकचे पोलीस निरीक्षक मधुकर कड व त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन केले.

सदरची कामगिरी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, गुन्हे शाखेचे उपायुक्त प्रशांत बच्छाव, गुन्हे शाखेचे सहाय्यक आयुक्त संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली शहर गुन्हे शाखा एकचे पोलीस निरीक्षक मधुकर कड, सहाय्यक पोलीस निरीक्षक हिरामण भोळे, पोलीस उपनिरीक्षक चेतन श्रीवंत,पोलीस उपनिरीक्षक सुदाम सांगळे, पोलीस हवालदार महेश साळुंके, उत्तम पवार, आप्पा पानवळ, विलास चारोस्कर, नितीन जगताप, राहुल पालखेडे, राम बर्डे, मुक्तार शेख, रोहिदास लिलके, जोगेश्वर बोरसे, किरण शिरसाट, सुकाम पवार, समाधान पवार, महिला पोलिस आमदार मनीषा सरोदे यांनी बजावली.

# महात्मा फुल्यांची श्रेष्ठ प्रेरणा-समता-मानवता



महात्मा फुले हे केवळ चार्तुवर्ण्यावर-ब्राम्हण श्रेष्ठत्वावर एकुण विषमताधिष्ठीत हिंदू धर्मावर आघात करुन थांबले नाहीत. तो त्यांच्या बंडखोरीचा केवळ आवश्यक आणि प्राथमिक असा विध्वंसक अविष्कार होता, पण त्याहूनही श्रेष्ठ अशी फुल्यांची प्रेरणा होती. ती म्हणजे संपूर्ण समतेची, बंधुत्वाची, मानवतेची, विश्वकुटुंबाची त्यामध्ये वर्ण, जात तर सोडाच पण देश, धर्म, वंश या मधिल भेदांना त्यांच्या वृथा अभिमानाला यकिंचितही वाव नव्हता. वंश, धर्म, देश, कृत्रिम मनुष्यनिर्मिती, भेदभाव आहेत. त्यामुळे मुठभर स्वार्थी लोकांचाच स्वार्थ साधतो, त्यासाठी ते सामान्य जनतेमध्ये नसते भेदभाव, विषमता, राग-द्वेष निर्माण करतात. त्यापासुन द्वेष नाही. वंश, धर्म, देश मुक्त नाही, म्हणुन या सर्वांचा विलय करुन त्याहून श्रेष्ठ अशा मानवतेची, समानतेची, स्वातंत्र्याची, विश्वकुटुंबाची प्राणप्रतिष्ठा केली पाहिजे, ही खरी फुल्यांची प्रेरणा होती, शिकवण होती.

-----------------

एकविसाव्या शतकाकडे नजर लावून बसलेल्या भारतात शिक्षण तळागाळापर्यंत पोहचू शकलेलं नाही हे वस्तुस्थिती नाकारता येत नाही. आजही समाजात हक्कांची जाण आहे. पण कर्तव्याचा विसरच पडला आहे. आजही दीनदुबळे दलित अन्याय सोसतच आहेत. परहिता साठी अष्टाप्रहर राबणारा, झिजणारा शेतकरी, कामकरी, श्रमजीवी आजही दारिद्र्याचे आणि अन्यायाचे चटके अनुभवतच वाटचाल करत आहे.

शहरे सोडली तर आजही खेडोपाडी, डोंगरी भागात छोटी छोटी मुलं कामाला जुपली जात असल्यानं शिक्षणाला वंचितच आहेत. शांतता वर्षातही शांतता औषधालाही नाही. उलट जिकडे तिकडे द्वेषाचे, विद्रोहाचे अशांत वातावरण खदखदत आहे. आजही साक्षरतेचे प्रमाण फारच कमी आहे.

महात्मा फुल्यांनी अस्पृश्य मुलांसाठी शाळा काढली आणि ज्ञानांच दालन त्यांच्यासाठी खुले केले हे जरी खरे असले तरी विषमता आणि जातीभेद यांना आज देखील पूर्णपणे मुठमाती मिळू शकलेली नाही, ही वास्तविकता आहे.

शिक्षणाचा प्रसार जर तळागाळापर्यंत झाला तरच क्रांती होईल असं तर "विद्येविना मती गेली, मतीविना निती गेली नीतीविना गती गेली गतीविना वित्त गेले आणि वित्तविना शुद्र खचले". शंभर वर्षापूर्वीची हिच स्थिती आजही आहे. माणसाच्या समुद्रात आज माणुसकीच हरवली आहे.

सामाजिक आणि आर्थिक विषमता याचं आजही पूर्णपणे उच्चाटन झालेले नाही. बंधुभाव फक्त ओठातच आहे.अशी स्थिती पाहिल्यावर महात्मा फुल्यांसारखी माणसं का बरं अस्वस्थ होणार नाहीत. आज जर महात्मा फुले आपल्यात असते तर त्यांनी आपल्या परखड विचारांच्या पवित्र्यांनी द्वेष, भ्रष्टाचार, अन्याय, दरिद्रय यांचा अंधःकार दूर करायचा नक्कीच प्रयत्न केला असता. आणि मग या विषयावर बोलायचा कदाचित प्रसंगही आला नसता.

हिंदू समाजातल्या मतलबी रुढींचा त्यांना तिरस्कार वाटू लागला. ज्योतिबाने शाळेतला अभ्यासक्रम पूर्ण करतांनाच 1847 पर्यंत ज्योतिबा बुध्दिने चांगले प्रौढ झाले होते. त्यांनी समाजाचे बारकाईने निरीक्षण केले. त्यातून त्यांच्या असे लक्षात आले की, आपला हिंदु समाज जातीभेदाने आणि विशिष्ट वर्गाच्या गुलामगिरीत राहिल्याने प्रतिगामी बनला आहे.

स्त्रियां आणि शुद्रांची कुचंबना होत आहे. हे सर्व स्त्रियां आणि बहुजन समाज शिक्षणापासुन दुर राहिल्यामुळे घडत आहे, असे त्यांच्या निदर्शनाला आले. त्यावरुन त्यांनी भावी जीवनातील कायार्ची दिशा ठरविली. ते सरकारी नोकरीच्या मागे न लागता समाजकार्य करायचे ठरवून कामाला लागले. सामाजिक गुलामगीरी दूर करणे आणि सर्वांना शिक्षणाची दारे खुली करणे त्यासाठी प्रयत्नशील राहणे हे त्यांच्या जीवनाचे ध्येय ठरले.

हे कार्य तत्कालीन रुढीप्रिय समाजाला रुचले नाही. मुलींची शाळा काढण्यासाठी पूर्व तयारी म्हणून त्यांनी आपल्या पत्नीला प्रथम शिक्षण दिले. सावित्रीबाईंनी ही आपल्या पतीच्या जीवन कार्याला मनापासून सहाय्य केले.

1848 मध्ये पहिली 1851 मध्ये दुसरी आणि 1852 मध्ये तिसरी मुलींची शाळा काढली. या शाळा व्यवस्थित चालू लागल्या. मेजर कँडी यांनी सरकारतर्फे 75 रुपये अनुदान मंजुर केले. फुले यांच्या या महान सामाजिक कायार्चा गौरव म्हणुन त्यांचा सत्कार ही करण्यात आला. या नंतर ज्योतिबांनी सामाजिक सुधारणेकडे विशेष लक्ष द्यायचे ठरविले. व्यक्ति स्वातंत्र्य, समता आणि बुध्दि प्रामाण्य यासाठी ते झगडू लागले.

सतीची प्रथा, विधवा पूर्नविवाह, भृणहत्या (लहान मुलांची हत्या) या समाज विघातक गोष्टींना त्यांनी विरोध केला. केवळ शाब्दिक विरोध न करता त्यांनी पुढाकार घेवून "बालहत्या प्रतिबंधगृह" ही संस्था सुरु केली. समाजस्पृश्य-अस्पृश्य असा भेदाभेद पाळणाऱ्याचा रोष पत्करुन त्यांनी आपल्या घरी असलेला पाण्याच्या हौद सर्वांना म्हणजे अस्पृश्यांनाही खुला केला.

शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, हे लक्षात येताच अस्पृश्यासाठी, स्त्रियांसाठी त्यांनी शाळा उघडल्या, अनाथाश्रम काढले, वृत्तपत्र काढले. धर्म जन्माने न मिळता माणसाच्या स्वतःच्या बुध्दीने स्विकारला पाहिजे. शेतकऱ्यांच्या व्यथा इंग्रज प्रशासनाच्या कानी पोहोचविल्या.

शेतकरी हा समाजाचा कणा आहे. पोशिंदा अन्नदाता आहे, असे मत मांडले आणि जगजागृती केली. त्यांच्या साठाव्या वर्षी जनतेने मुंबईस त्यांचा नेत्रदिपक सत्कार करुन त्यांना "महात्मा" ही पदवी बहाल केली. सामाजिक समता, आर्थिक न्याय व शोषणमुक्ती यासाठी ज्योतिबाने अखेरच्या क्षणापर्यंत प्रयत्न केले.

त्यांच्या पुरोगामी विचारांना कृतीची जोड मिळाली जणू ती मानवतेच्या कणवतेची बैठक होती. ज्योतिबांच्या कृतीमुळे, कर्तृत्वामुळे या समाजाची नवी पहाट उदयास आली. सावित्रीमाई भारतातील आद्यक्रांतीकारी थोर स्त्री होती. ज्योतिबांना सावित्रीमाईची सक्रीय साथ लाभली.

सामाजिक सुधारणेची सुरुवात आपल्या घरापासुन करणारे ज्योतिबाफुलें सारखे समाजसुधारक युगात होणे अशक्य आहे. सुधारकाग्रणी, संपूर्ण महाराष्टाचे भुषण, सुधारकांचे सुधारक त्यांच्या विचारांनी आणि धाडसी वृत्तीने कृत्तीने समाजाला जागे केले. काळाच्या खूप पुढे जाण्याचे सामर्थ्य त्यांच्यात होते. हीन-दीन-जीवांना एकोणिसाव्या शतकात त्यांनी आपल्या विशिष्ट ध्येयासाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले.

मानवी सामाजिक सुधारणेचे अवलोकन केले, परिस्थितीचे अवलोकन केले आणि प्रकाशमय मानवी स्वातंत्र्याच्या दिव्य युगाकडे सामाजिक माणसाच्या नवयुगाची ग्वाही देणारा आधुनिक भारतातील पहिला समाजक्रांतीकारक क्रांतिबा ज्योतिराव फुले नावाचा धगधगता लाव्हा तयार झाला.

कारण देशात जातीभेदाची सुनामी ऊफाळुन आली होती. त्यामुळे कोणी शुद्र नदीकाठावर वस्त्रधुत असता तेथे एखादा भट आला तर शुद्रास आपली सर्व वस्त्रे गोळा करुन भटाच्या अंगावर शिंतोडा येण्याचा संभव नाही, अशास्थळीजाऊन वस्त्रे धुवावी लागत.

भटाच्या अंगावर नकळत पाण्याचा शिंतोडा उडालाच तर भटाने रागाने अग्नीसारखे तप्त होऊन आपल्या जवळचे जड भांडे शुद्रांच्या डोक्यावर मारावे, ब्राम्हणावर तर सावली सुध्दा पडू नये याची पूर्णपणे खबरदारी शुद्राने वस्तीतून वाट असेल त्या वाटेवरुन जाण्यास सुध्दा धोका पत्करु नये असा कायदा, अशा कायद्याचे राज्य होते, त्यामुळे राज्यात अनेक छळवाद होते. स्त्रियांना तर त्या रुढीने बंदीस्तच करुन ठेवले होते.

पुरुषप्रधान व्यवस्थांच्या रणधुमाळी विषयी फुले म्हणतात की, स्त्री ही जात अबला असल्यामुळे तिच्यापूढे लोभी व धाडसी पुरुषांनी स्वतःचेच म्हणणे खरे केले आणि स्त्रीयांना मानवी हक्क समजू नयेत म्हणून पूर्ण अंधारात ठेवले. ज्योतिरावांना सावित्रीमाईंची भक्कम साथ मिळाल्यानंतर त्यांनी विचार केला की, हे आता शुद्र अतिशुद्रांचा छळवाद बदलला पाहिजे. त्यावेळे पासून स्त्री चळवळीचा जन्म झाला.

महात्मा फुले आज जरी आमच्यात नाहीत परंतु कर्तृत्वाच्या रुपाने ते निश्चितच आमच्यांत आहेत. कारण जे दुस-यांसाठी मरतात, तेच खऱ्या अर्थाने जगतात आणि आपल्या कार्यकर्तृत्वाच्या रुपानं अमर असतात, म्हणजेच आपल्यातच असतात. आता हे जर खरं असेल तर महात्मा फुले देखील कार्यरुपानं आपल्यातच आहेत, असं नाही का तुम्हाला वाटत?

मला तर वाटतं, या विषयाच्या निमित्तानं ज्ञानज्योतीचं चरित्र आणि चारित्र्याचा आचार, विचार आणि उच्चाराचा जवळून परिचय व्हावा आणि आपण त्यांचे कार्य जोमानं, जिद्दीनं आणि निष्ठेनं करावं असंच बहुधा बहुतेकांना अपेक्षित असावं लौकिकअर्थानं आज जरी महात्मा फुले आपल्यात नसले, तरी त्यांचे अलौकिक कार्य कलेकलेनं वाढतच राहणार आहे.आणि त्यांचे अस्तित्व तर नेहमीचे आपल्यात राहणार आहे.

ज्ञानज्योत प्रज्वलित केलेल्या ज्योतिबांना सामाजिक समता, मानवता, विवेक, विनय आणि नम्रता यावर प्रकाश टाकुन राष्ट्राला स्वायत्ततेच ध्येय गाठण्यासाठी गतिमान बनवायचं होतं. समाजजागरणाचा वसा घेतलेले स्त्रीशिक्षण आणि स्त्रीशक्ति जागृतीचा मंत्र निनादात ठेवणारे, आणि अस्पृश्यांबद्दल कणव आणि बंधुता बाळगणारे ज्योतिबा आज असते तर ! खरंच काय बरं वाटलं असतं त्यांना ?

आजही समाजात समता आणि बंधुता पूर्णपणे उतरु शकली नाही हे पाहून ते नक्कीच अस्वस्थ झाले असते. जयंती आणि पुण्यतिथी या दोन दिवशी आपली आठवण ठेवणारे, याच दिवशी आपल्या पुतळ्याला हार घालून खोटी पूजा करुन अवडंबर माजवणारे तथाकथित कार्यकर्ते आणि पुढारी पाहून त्यांना नक्कीच चीड आली असती.

फुले आणि आंबेडकरांचे हे अतूट नाते ध्यानात घेतले की, दोघांच्याही वैचारिक त्याचप्रमाणे व्याव्हारिक जीवनावरही नवाच प्रकाश पडतो. दोघांचे चरित्र आणि कतृत्व शेजारी शेजारी ठेवले. तर दोन्ही समजायला निःसंशय मदत होते. 63 वर्षे चंदनासारखे झिजले. प्रवास केला, व्याख्याने दिली, लेख लिहिले. स्वातंत्र्य, समता, लोकशाही, विज्ञान, इहवाद या आधुनिक मुल्यांवर भर देऊन सामाजिक क्रांतीची प्रेरणा दिली.

डॉ. आंबेडकरांनी त्यांना गुरु मानले. सहज सोप्या भाषेत नेमकी स्पष्टता आणणे त्यांना जमत असे. विचारांना कृतिशीलतेची जोड दिली.

*जैसे बोलावे, तैसे चालावे,*
*मग महंतलीला स्वभावे, अंगी बाणे*

या समर्थवचनाची सार्थकता सिध्द करणारा हा महात्मा सर्व सुखाचे आगर नीतितत्त्वांचे माहेर अशा या महात्म्याचे अविरत कष्टाने 28 नोव्हेंबर 1890 मध्ये अनंतात विलीन झाले, त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !

■ ■ ■



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919
pravinbagde@gmail.com

# स्त्रीयांचा उद्धारकर्ता महात्मा ज्योतीराव फुले

स्त्रीचा उद्धारकर्ता म्हणून महात्मा ज्योतीरावं फुले यांना ओळखले जाते. जातिबहिष्काराचे असहाय असे दडपण क्रियावान सुधारकांना सोसावे लागले. जिवलग नातेवाईकांचा विरोध सतत होत असे. परिणामी जोतीरावांचे वडील गोविंदराव यांनी मुलगा व सुन यांना घराबाहेर काढले.

ते माळी समाजाचे असून देखील माळी समाजाने त्यांची नाना प्रकारे अवहेलना चालू केली. या सर्व प्रतिकूल परिस्थितीला धैर्याने तोंड देऊन ज्योतीराव व सावित्रीबाई यांची समाजसुधारणेच्या क्षेत्रात आगेकूच सुरूच राहिली. नंतर रास्त पेठेत व वेताळ पेठेत दोन शाळा काढल्या. अस्पृश्यांसाठी शाळा काढली यास त्यांच्या प्रयत्नांना तत्कालीन मोठ मोठ्या विचारवंत समाजसुधारकांचा व राज्यकर्त्यांचाही पाठिंबा मिळत राहिला.



सौ. चैताली संगोपाल वरघट
मूर्तिजापूर, जि. अकोला.
9834583685

1852 मध्ये सरकारी विद्याखात्याकडून मेजर कॅन्डी यांच्या अध्यक्षतेखाली ज्योतिरावांच्या शिक्षण कार्याबद्दल त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. त्या काळात हिंदूंच्या उच्च जातींमध्ये विधवा विवाह निषद्ध मानला होता. बालपणी व वारंवार उद्भवणाऱ्या प्राणघातक साथीच्या रोगामुळे पतीनिधन होऊन तरुणपणीच वैधव्य आलेल्यांची संख्या मोठी होती.

केशवपन केल्याशिवाय विधवा ही अपवित्र असे. अशा बाल व तरुण विधवांचा प्रश्न सोडविण्यासाठी सुरू झालेल्या पुनर्विवाहाच्या चळवळीत ज्योतिरावांचा पूर्ण सक्रिय पाठिंबा होता. वासनेला बळी पडलेल्या विधवांची फार विटंबना होत होती. गर्भपाताचे प्रयत्न होत. जन्मलेल्या बालकांची हत्याही होई.

त्यांना संरक्षण देण्यासाठी फुले यांनी बालहत्या प्रतिबंधकगृहाची स्थापना केली. या गृहात अशा स्त्रियांच्या बाळंतपणाची ही सोय केली होती.ज्योतिरावांनी पुढे जो 'यशवंत' नावाचा मुलगा दत्तक म्हणून घेतला तो काशीबाई नावाच्या ब्राह्मण विद्येचा मुलगा होता. विधवांच्या केशवपनाची चाल बंद व्हावी म्हणून त्यांनी चळवळ उभी केली व त्याकरता न्हाव्यांचा संपही घडवून आणला. अस्पृश्य व दलितांच्या प्रश्नालाही त्यांनी तितक्याच मनस्वीपणे चालना दिली.

अस्पृश्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही एक अत्यंत गंभीर अशी कायमची समस्या लक्षात घेऊन आपल्या वाड्यातील पाण्याचा हौद त्यांनी अस्पृश्यांसाठी खुला केला. महात्मा फुले हे नगरपालिकेचे सदस्य होते.

समाजाच्या मौलिक परिवर्तनाकरिता समाजरचनेतील धर्मभेद मूलक विद्वेष, जातीभेदमूलक उच्चनीच भाव, स्त्रीदास्य, हिंदू धर्म संस्थेतील मूर्तीपूजा, संस्कृत भाषेतील कर्मकांड या गोष्टीचे उच्चाटन करून समताप्रधान समाज निर्माण करण्याकरिता व अंधश्रद्धेचे निमुलन करून वैचारिक क्रांती करण्याकरिता सत्यशोधक समाजाची स्थापना फुले यांनी केली.

या सत्यशोधक समाजाचे सर्व धर्माचे व जातीचे नागरिक सदस्य व्हावेत अशी योजना केली होती. सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक या निबंधात फुले यांनी आपल्या समग्र विचारांचे सार असलेल्या 'विश्वकुटुंबबावादाची' सुसंगत मांडणी केली आहे. हा निबंध लिहीत असताना त्यांना पक्षपात झाला होता. अशा विकलांग अवस्थेत त्यांनी हा निबंध लिहून पूर्ण केला.

यात स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या मूलभूत मानवी मूल्याच्या आधारावर समाज रचना कशी असावी, हे सांगितले आहे. ज्या तत्त्वांच्या आधारावर अमेरिकन राज्यक्रांती व फ्रेंच राज्यक्रांती झाली तीच तत्वे या पुस्तकात भारतीय समाज रचनेच्या संदर्भात मांडली आहे.

यात सांगितलेल्या सत्यधर्म हा युटोपियाच होय. जगातल्या मोठमोठ्या सामाजिक व राजकीय क्रांत्या युटोपीयन धैर्यवादाने प्रेरित झालेल्या दिसतात. फुले म्हणतात स्त्री अथवा पुरुष एकंदर सर्व गावच्या, प्रांताच्या, देशाच्या व खंडाच्या संबंधाने आता कोणत्याही धर्मातील मतांच्या संबंधाने कोणत्याच प्रकारची आवड निवड न करणारे, या सर्व स्त्री-पुरुषांनी या भूगोलावर आपले एक कुटुंब समजून एकमताने, एकजुटीने एकमेकांशी सत्य वर्तन करून वागावे, इतकेच काय, एकाच घरात बौद्ध धर्मी बायको, खिस्त धर्मी नवरा, इस्लाम धर्मी कन्या व सार्वजनिक सत्यधर्मिपुत्र यांना प्रेमाने नांदायला लावील तोच खरा धर्म होय.

यात आर्थिक समता सुचित केली आहे आणि सत्यधर्मी समभाव स्वच्छ रीतीने मांडलेला आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांचा ' 'मानवतावाद'हा त्यांचा जीवनध्यास होता. त्याच बरोबर शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी लढणारे महाराष्ट्रातील महात्मा ज्योतीरावं फुले पहिले समाज सुधारक होते.

ज्योतिरावांनी लोकशिक्षणाला महत्त्व दिले. जुलमी सावकारी विरुद्ध लढा देण्यासाठी पुणे व नगर जिल्ह्यात त्यांनी शेतकऱ्यांचे बंड घडवून आणले. हे बंड खतफोडीचे बंड या नावाने प्रसिद्ध आहे. जुन्नर तालुक्यात त्यांनी शेतकऱ्यांचा पहिला असहकार घडविला.

खतफोडीच्या बंडाशी संबंधित व्यक्ती म्हणजे महात्मा ज्योतिराव फुले होय. त्यांना महाराष्ट्राचे 'मार्टिन ल्युथर किंग' असे संबोधले जाते. महात्मा फुले यांच्या प्रेरणेने महाराष्ट्रातील चळवळी सुरू झाल्या. दलिततोद्धार चळवळ, कामगार चळवळ, ब्राह्मणेत्तर चळवळ, महात्मा ज्योतिराव फुले यांचे कार्य शिक्षण व समता यावर आधारलेले होते. या महात्म्याला विनम्र अभिवादन!!

■ ■

# ११ एप्रिल दिनविशेष

**महत्वाच्या घटना :**
१९१९: इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनची स्थापना झाली.
१९७०: अपोलो-१३ यानाचे प्रक्षेपण झाले.
१९७९: युगांडाचे हुकूमशहा इदी अमीन सत्ता सोडून पळून गेले.
१९७६: ॲपल कंपनीचे ॲपल १ हे कॉम्पुटर तयार झाले.
१९८६: हॅलेचा धूमकेतू पृथ्वीच्या सर्वात जवळ येत साडेसहा कोटी किलोमीटर अंतरावरून गेला.
१९९२: चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, लेखक भालजी पेंढारकर यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला.
१९९९: अग्नी-२ या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी झाली.

**११ एप्रिल जन्म :**
१७५५: कंपवाताचा मानवी मेंदूशी संबंध आहे हे सिद्ध करणारे शास्त्रज्ञ जेम्स पार्किन्सन यांचा जन्म.
१७७०: ब्रिटनचे पंतप्रधान जॉर्ज कॅनिंग यांचा जन्म.
१८२७: : श्रेष्ठ समाजसुधारक तसेच श्रमजीवी वर्गाच्या शोषणाची दास्याची मीमांसा करणारे क्रांतिकारक विचारवंत जोतिराव गोविंदराव फुले ऊर्फ महात्मा फुले यांचा जन्म.
१८६९: कस्तुरबा गांधी यांचा जन्म.
१८८७: चित्रकार जेमिनी रॉय यांचा जन्म.
१९०४: गायक आणि अभिनेते कुंदनलान सैगल यांचा जन्म.
१९०६: संस्कृत, प्राकृत, कोकणी या भाषांचे अभ्यासक डॉ. सुमित्र मंगेश कत्रे यांचा जन्म.
१९३७: लॉनटेनिस खेळाडू रामनाथन कृष्णन यांचा जन्म.
१९५१: अभिनेत्री रोहिणी हटंगडी यांचा जन्म.
१९२०: इटलीचे ४०वे पंतप्रधान एमिलियो कोलंबो यांचा जन्म
१९१०: पोतुर्गाल देशाचे १४वे राष्ट्राध्यक्ष, जनरल आणि राजकारणी अँटोनियो डी स्पिनोला यांचा जन्म
१६११: लिकटेंस्टाईनचे राजकुमार कार्ल युसेबियस यांचा जन्म

**११ एप्रिल मृत्यू :**
१९२६: अमेरिकन वनस्पतिशास्त्रज्ञ ल्यूथर बरबँक यांचे निधन.
१९७७: भारतीय लेखक फन्नीश्वर नाथ रेणू यांचे निधन.
२०००: कर्करोग संशोधन क्षेत्रातील अग्रणी शास्त्रज्ञ, पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित कमल समर्थ ऊर्फ कमल रणदिवे यांचे निधन.
२००३: टेक्सास इन्स्ट्रूमेंटचे स्थापक सीसिल हॉवर्ड ग्रीन यांचे निधन.
२००९: भारतीय लेखक व नाटककार विष्णु प्रभाकर यांचे निधन.
२०१५: जनरल लेफ्टनंट हनुतसिंग राठोड यांचे निधन.
२०१२: अल्जेरियाचे पहिले अध्यक्ष अहमद बेन बेला यांचे निधन

## मंत्रालयात नवे तंत्रज्ञान, पण जुन्या सवयी
# पासऐवजी कचऱ्याचा मारा!




मंत्रालयात प्रवेशासाठी डीजी प्रवेश नावाची अत्याधुनिक प्रणाली सुरू झाली आणि प्रशासनाने छातीठोकपणे घोषणा केली की, आता सगळं डिजिटल होणार, रांगा संपणार, आणि प्रत्येक अभ्यागताची नोंद ठेवली जाणार!

पण ही "नवी प्रणाली" प्रत्यक्षात कचऱ्याचा डबा बनली आहे, हे पाहून हसावं की रडावं हेच कळेनासे झाले आहे. डीजी प्रवेश ॲपद्वारे दुपारी दोननंतर अपॉइंटमेंट घेऊन मंत्रालयात येणाऱ्यांना गळ्यात अडकवण्यासाठी पास दिला जातो. हा पास बाहेर पडताना ड्रॉप बॉक्समध्ये टाकायचा, अशी सोपी योजना. पण आमच्या सर्वसामान्यांनी या डब्यात पासऐवजी कचरा, पाण्याच्या बाटल्या आणि बसची तिकिटे टाकून नव्या युगाची सुरुवातच वेगळ्या पद्धतीने केली आहे!

प्रशासनाने डब्यात पास मिळतील अशी अपेक्षा ठेवली, पण त्याऐवजी चुरमुरे, बिस्किटांचे पुडे आणि कोल्ड्रिंकच्या रिकाम्या बाटल्या मिळाल्या. एका अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले, "आम्ही पास गोळा करायला गेलो, तर डबा उघडताच दुर्गंधी आली. ही प्रणाली आमच्यासाठी की आम्हाला त्रास देण्यासाठी, हेच कळत नाही."

उन्हाळ्याच्या कडक ऊनात रांगेत उभे राहून पास मिळवणाऱ्या सामान्य माणसाला तर दुप्पट कष्ट पडत आहेत. एकदा रांगेत, आणि दुसरे काम होईल की नाही याची शाश्वती नसताना. मंत्रालयात येणाऱ्यांची नोंद ठेवण्याचा उद्देश डिजिटल प्रणालीचा होता, पण लोकांनी ड्रॉप बॉक्सला कचराकुंडी बनवून टाकले. "काम होत नाही, तरी कचरा तरी टाकून जाऊ," अशी भावना लोकांमध्ये दिसते. दरम्यान, रांगा कायम आहेत, उकाडा वाढलाय, आणि पास काढूनही कामाची खात्री नाही. प्रशासनाला आता नवे ॲप काढावे लागेल..कचरा व्यवस्थापनासाठी! खरंच, तंत्रज्ञान बदलले, पण माणसाच्या सवयी बदलायला अजून काही काळ लागेल, की काय?

■ ■ ■



दीपक कैतके

# दही खाण्याची योग्य पद्धत कोणती?



कधी आणि किती दही खाणे आरोग्यदायी उन्हाळ्यात दही खाण्याचे अनेक फायदे आहेत. दही आरोग्यासाठी फायदेशीर असते. परंतु दही योग्य पद्धतीने खाणे महत्वाचे आहे.

आयुर्वेदात दही खाण्याबाबत काही नियमही सांगितले आहेत. म्हणूनच दही कसे खावे? याबद्दल अनेक लोक गोंधळलेले असतात. दही योग्य पद्धतीने सेवन केल्यास त्याचे दुहेरी फायदे मिळू शकतात. पण जर तुम्ही दही खाताना काही चुका केल्या तर ते नुकसान देखील करू शकते.

**दही खाण्याची योग्य वेळ कोणती?**

दही खाण्याची योग्य वेळ कोणती? हा प्रश्न महत्वाचा आहे. दही खाण्याची योग्य वेळ सकाळचा नाश्ता मानली जाते. यामुळे नियमित नाश्त्यात दहीचा समावेश तुम्ही करू शकता. दही खाल्यामुळे पचनसंस्था सुधारते आणि पचनाशी संबंधित समस्या कमी होतात. दुपारच्या जेवणाच्या वेळी, दही, रायता किंवा ताक देखील जेवणासोबत घेता येते. हे तुम्हाला अन्न पचवण्यास देखील मदत करते. आयुर्वेदानुसार रात्री दही खाणे टाळावे. रात्री ते खाल्ल्याने पित्त आणि कफ विकारांची समस्या वाढू शकते.

**दही कसे खावे?**

दह्यात कोणतीही गोष्ट न मिसळता खाणे चांगले मानले जाते. जर तुम्ही साधे दही खाऊ शकत नसाल आणि तुम्हाला गोड दही खायला आवडत असेल तर थोडे मध, साखर किंवा गूळ त्यात मिसळू शकता. जर तुम्हाला खारट दही आवडत असेल तर हलके खारट दही खा. यासाठी तुम्ही दह्यात सेंधा मीठ किंवा काळे मीठ टाकू शकता. काही लोक तुपासोबत दही खातात, त्यामुळे तुमची पचनक्रिया सुधारते. दही फळ, भाज्यासोबत खाल्यास ते अधिक चांगले असते.

■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



# ज्ञान ज्योती

विद्येविना मती गेली
सांगती ज्योतिबा फुले
बहुजनांच्या दारिद्र्याचे
कारण स्पष्ट केले . . !

निरक्षरतेमुळे—
खचतो आत्मविश्वास
अंधश्रध्दा वशोषणाचे
पडती गळी फास

शाळा सुरु करूनी
मार्ग दाविला त्यांनी
चला आज नतमस्तक
होऊ त्यांच्या चरणी ..!

[illegible]



[illegible]



[illegible]



[illegible]



[illegible] www.sonatawatches.in [illegible]



[illegible]


## आज का अंदाज

शुक्रवार ११ मार्च २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

कल्याण बाजार

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 5 | 6 | 9 |
| 138 | 780 | 178 | 388 |
| 246 | 456 | 358 | 568 |
| 589 | 122 | 268 | 225 |
| 21 | 51 | 64 | 94 |
| 27 | 57 | 60 | 90 |
| 23 | 53 | 68 | 98 |

मुंबई बाजार

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 4 | 5 | 8 |
| 689 | 239 | 230 | 189 |
| 166 | 590 | 357 | 260 |
| 599 | 347 | 456 | 350 |
| 39 | 49 | 56 | 86 |
| 30 | 40 | 52 | 82 |
| 31 | 41 | 57 | 87 |


११ एप्रिल २०२५
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 02 | 12 | 43 | 73 |
| 05 | 15 | 46 | 76 |
| 08 | 18 | 49 | 79 |

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.
प्रो. बालाजी कुमार
9822486034


[illegible]

## शब्दकोडे क्रमांक २०८१




**आडवे शब्द :-**
१) मैने प्यार किया, दबंगचा नायक
५) सिद्ध
९) आईचा भाऊ
११) सातव
१२) सट्टयाचा एक प्रकार
१३) भावांच्या बायकांसंबंधी, सामाईक
१७) पाताळ
२०) दोन आण्याचे नाणे
२१) लक्ष्मीचे एक नाव
२३) हाड, छोटे हाड (ग्रा.)
२४) पक्के आश्वासन
२६) माळ, हार (हिं.)
२७) माल
२८) वर्णन करणे
२९) व्रत
३०) कलावंत
३२) एकरुप
३५) वरपांगी
३६) ढग
३७) नकार देणे
३९) वितरण
४१) दात
४३) किंमत
४४) पुरुष
४६) श्रीमंत
४८) हेतू, कारण
५१) साधारण, जेमतेम
५२) थोडक्यात महाराष्ट्र राज्य
५४) कणव
५५) लाकूड कापण्याचे हत्यार
५७) कालाचे परिमाण
५८) कैवारी, सांभाळणारा
५९) मनाला आलेला थकवा
६१) कपाळाला झालेली खोलवर जखम
६३) अर्धवर्तुळाकार
६५) आजीची आई
६७) विवाहित स्त्री
६९) सुसर
७०) डोंगराचा उभा भाग
७१) आशीर्वाद
७२) तृष्णा
७३) दक्षतेचा इशारा
७४) दया

**उभे शब्द :-**
१) बाजरी
२) बारीक केस
३) वाकणे, नमणे
४) बाज, पलंग
५) होकार नसणे
६) प्रकृती
७) काढलेली सुट्टी
८) पाळलेले, माणसाळलेले (जनावर)
९) भ्रम, जादू
१०) बागवान
१४) धाक, दरारा
१५) स्तुती
१६) कलेचा साठावा अंश
१८) मागे-पुढे करणे, तारतम्य
१९) किंचित छोटा
२२) घराण्याला कलंक लावणारा
२५) फुटाणे
२६) मत्स्य
२८) वाईट इच्छा
२९) राबता, जाणे-येणे
३०) हात
३१) मोटार(इं.)
३३) आई (इं.)
३४) सापाची एक जात
३५) केस कापणे
३८) एकाद्याच्या वतीने भीड घालणे
४०) उलथणे
४२) धमकी
४५) प्रजा
४६) प्रतिष्ठित
४७) भविष्य कथनाचा एक प्रकार
४९) केलेला अंदाज
५०) तात्पर्य
५३) श्रीरामाची चरित्र गाथा
५५) नवाकोरा
५६) वागणूक
५७) यम, मृत्यू, वेळ
५८) लाकूड तासण्याचे हत्यार
५९) मनाला आलेला थकवा
६०) फिरता पहारा
६२) उष्ण
६४) किंमत
६५) जहाज, जहाजाचा मुक्काम
६६) पाणी, आयुष्य
६८) गाईचे पिल्लू
७०) कशा प्रकारचा

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## महत्त्वाचे

### माऊली लॉन्सजवळ चारचाकीवर कोसळले आंब्याचे झाड

**सिडको ।** माऊली लॉन्स परिसरातील मुरारी नगर भागात कॉलनी रोडवर एक रो हाऊस समोर असलेले जुने आंब्याचे झाड अचानक रस्त्याच्या कडेला उभ्या असलेला चार चाकी वाहनावर कोसळले. यात कुठलीही जीवित हानी झाली नाही रविवारी दुपारी ही घटना घडली. मुरारी नगर भागात असलेल्या कॉलनी रस्त्यावर आंब्याच्या झाडाला कीड लागली होती व ते झाड अनेक दिवसांपासून वाऱ्यामुळे हलत होते. त्यामुळे हे झाड धोकादायक असल्याची तक्रार उद्यान विभागाकडे वारंवार करण्यात आली होती. नागरिकांनी झाडाची छाटणी करण्याची मागणी केली होती. मात्र उद्यान विभागाने कोणतीही कारवाई केली नाही. त्यानंतर रविवारी अचानक हे झाड रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका चार चाकी वर कोसळले. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने अग्निशमन विभागाला कळवले. काही वेळातच अग्निशामक पथक घटनास्थळी दाखल झाले आणि झाडाची काटछाट करून रस्त्यावरचा अडथळा दूर केला. परिसरातील धोकादायक झाडांच्या फांद्या छाटण्याची मागणी नागरिकांनी केली.

### श्रीराम मंदिरातर्फे सवाद्य पालखी मिरवणूक

**इंदिरानगर ।** येथील श्रीरामनगर श्रीराम मंदिरातर्फे पालखी मिरवणूक काढण्यात आली. दीपालीनगर, विनयनगर, साईनाथनगर परिसरातून



ही मिरवणूक काढण्यात आली होती. श्रीराम, लक्ष्मण आणि सीतेच्या वेशभूषा केलेली बालके सजवलेल्या रथातील लक्षवेधी ठरली. भगवी साडी आणि भगवे फेटे परिधान केलेल्या महिलांची उपस्थितीही लक्षणीय होती. हर्षल आणि दिशा वनारा, शुभांगी आणि निखिल गांगुर्डे, शिल्पा आणि विशाल सोनवणे यांनी पूजन केले. माजी नगरसेवक यशवंत निकुळे, रूपाली निकुळे, ॲड. अजिंक्य साने, सचिन कुलकर्णी, मनीषा खोडे, साहेबराव सोनवणे,राजेंद्र कदम, संजय गिते, रिमा गुलाटी आदी उपस्थित होते. यावेळी स्वयंसिद्ध महिला मंडळ, जोगेश्वरी महिला मंडळातर्फे भजन झाले. लायन्स ग्रुप ऑफ नाशिक तर्फे रक्तदान शिबिर झाले. दुपारी आमदार देवयानी फरांदे यांच्या उपस्थितीत महाआरती झाली. दर्शना साठी भाविकांची गर्दी झाली होती. भगवान सोनवणे, सुधाकर वारे, ओंकार जगळे, पंडित नेरे आदींनी संयोजन केले. दिवसभर भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. सायंकाळी मराठी भाव भक्तीगीतांचा गीतरामायणवर आधारित गाण्यांचा कार्यक्रम झाला.

### नाशिक रोड बसस्थानकात उभ्या वाहनांमुळे अडथळा

**नाशिक रोड ।** बस स्थानकामध्ये सध्या पोलीस विभागाच्या उभ्या वाहनामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. ही गाडी किमान वर्षभरापासून या ठिकाणी धूळ खात रस्त्यातच पार्क केली आहे. या वाहनावर पोलीस असे लाल अक्षरात नाव असून, पोलीस चौकीच्या शेजारी रस्त्यावर ही सफेद रंगाची गाडी गेल्या वर्षभरापासून पार्क करण्यात आलेली आहे. बस स्थानकात येण्यासाठी गाड्यांना या वाहनामुळे अडथळा निर्माण होत आहे. गाडी पोलीस विभागाने नियोजित स्थळी स्थलांतर करावी, अशी मागणी येथील व्यावसायिकांनी केली आहे.

### त्रिमूर्ती चौकात टोळक्याकडून दुचाकीस्वाराला बेदम मारहाण

**नाशिक ।** त्रिमूर्ती चौकात मंगळवारी भर दुपारी युवकावर कोयता व चोपरने वार केल्याच्या घटनेला 24 तास उलटत नाही तोच याच परिसरातील असलेल्या बारसमोर मद्यपी टोळक्याने एका दुचाकी स्वाराला बेदम मारहाण केल्याचा प्रकार घडला. त्रिमूर्ती चौकातील एका शाळेच्या बाहेर मंगळवारी दुपारी एकला सागर कोळी या युवकावर संशयित जय गुरव व त्याच्या साथीदारांनी कोयत्यासह चोपर, लाकडी दांडक्यांनी हल्ला केला होता. याप्रकरणी जखमीकडून कोणतीही तक्रार न आल्याने अंबड पोलिसांनी हत्यार बाळगून दहशत माजविल्या प्रकरणी संशयित जय गुरव यांच्या विरोधात आंबट पोलिसात गुन्हा दाखल केला. घटनेला 24 तास होत नाही तोच बुधवारी दुपारी तीन-साडेतीन लाख सुमारास एक फूड डिलिव्हरी बॉय दुचाकीवरून जात असताना त्याच्या मागे असलेला दुचाकीस्वार पडला. म्हणून डिलिव्हरी बॉय थांबला. सदरची घटना त्रिमूर्ती रोडवरील एका दुकानासमोर झाली. त्यावेळी मध्याच्या नशेतील टोळक्याने कोणतेही कारण नसताना फूड डिलिव्हरी बॉयला मारहाण मारहाण करून परिसरात दहशत माजवून पसार झाले. या प्रकरणी अंबड पोलिसात उशिरापर्यंत कोणतीही नोंद नव्हती.

# भगवतीच्या दर्शनासाठी उसळली गर्दी; पोलिसांचे चोख नियोजन

**कळवण ।** सप्तशृंगी गडावर सकाळपासूनच पहाटे पाच वाजल्यापासून भाविकांनी दर्शनासाठी एकच गर्दी केली होती. त्याच अनुषंगाने दर्शनासाठी भाविकांची अचानकपणे गर्दी उसळल्याने पोलीस प्रशासन व ट्रस्ट यांची एकच तारांबळ उडाली.

मात्र डीवायएसपी किरणकुमार सूर्यवंशी कळवण यांनी त्वरित पोलीस बंदोबस्त लावून बाऱ्यांचे योग्य ते नियोजन करून पाटील चौक दवाखाना पोलीस चौकी पॉईंट ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करून गर्दीवर नियंत्रण मिळवले कुठल्याही प्रकारचे चेंगरा चांगरी झाली नाही. भाविकांनी कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पोलीस प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. भाविक- व्यवस्थितरित्या दर्शनासाठी जात आहेत. सकाळपासून पोलिसांनी आपला बंदोबस्त कडक ठेवल्यामुळे गर्दीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. यावेळी पोलीस निरीक्षक खगेंद्र टेंभेकर, अभोणा, वणी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक, ट्रस्टचे व्यवस्थापक सुदर्शन दहातोंडे, कार्यकारी अधिकारी भगवान नेरकर, जनसंपर्क अधिकारी भिकन वाबळे, कार्यालयीन अधीक्षक प्रकाश जोशी, आपत्ती व्यवस्थापनाचे पथक प्रमुख संकेत नेवकर, मंगेश केदारे, महाराष्ट्र सुरक्षा बल कर्मचारी, ट्रस्टचे कर्मचारी, ग्रामपंचायत ग्रामसेवक संजय देवरे, ग्रामपंचायत उपसरपंच संदीप बेनके, सदस्य राजेश गवळी, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष अजय दुबे, सामाजिक कार्यकर्ते विवेक बेनके; शांताराम गवळी, आदींनी मदतीसाठी धाव घेतली व गर्दी नियंत्रणात आणली भाविकांचा सुखरूप दर्शन करीत आहेत.



**अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन**



## स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा पोलिस आयुक्तांच्या हस्ते विशेष सन्मान






**नाशिक ।** स्वामी विवेकानंद विद्यालय, पंचवटी येथील विद्यार्थ्यांनी "रस्ता सुरक्षा अभियान–जानेवारी 2025" अंतर्गत शहरात जनजागृती मोहीम राबवली. या उपक्रमात इको क्लब , हरित सेना तसेच आर.एस.पी विभागाच्या विद्यार्थ्यांनी निमाणी सर्कल येथे थेट रस्त्यावर उतरत वाहनचालकांना हेल्मेट वापरणे, सीट बेल्ट लावणे, वाहतूक नियमांचे पालन याबाबत जागृती केली.

विशेष आकर्षण ठरले ते एका विद्यार्थ्याने घेतलेली "यमराज" वेशभूषा, ज्यातून "नियम पाळा, अन्यथा मला यायला वेळ लागणार नाही..." असा संदेश देत उपस्थितांचे लक्ष वेधले. याशिवाय विद्यार्थ्यांनी "नो हॉर्न डे", सार्वजनिक वाहनांचा वापर, PUC तपासणी आणि प्रदूषणमुक्त शहर या विषयांवरही जनजागृती करत समाजापुढे सकारात्मक संदेश दिला. या अभिनव उपक्रमातील सर्व विद्यार्थ्यांना पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उपायुक्त, चंद्रकांत खांडवी व पोलीस उपायुक्त, प्रशांत बच्छाव यांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून तर वाहतूक विभागाचे पोलिस उपआयुक्त यांच्या हस्ते प्रदिपसिंग पाटील यांना नाशिक वाहतूक पोलीस ट्राफिक ॲम्बेसेडर म्हणून विशेष पदक देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी राबविण्यात आलेल्या उपक्रमांच्या फोटो अल्बमचे अनावरण देखील आयुक्तांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास किशोर झोटींग प्रदिपसिंग पाटील, शहर वाहतूक विभागाच्या सहा.पोलिस आयुक्त पद्मजा बढे , व.पो.नि.दिवाणसिंग वसावे पोलीस हवालदार सचिन जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशस्वी सहभागाचे मुख्याध्यापक किशोर झोटिंग व पर्यवेक्षिका शुभदा टकले यांनी अभिनंदन केले.

## रखरखत्या उन्हातही देवीभक्त भगवतीच्या दर्शनासाठी गडावर, गर्दीत होतेय वाढ

**कळवण ।** आग ओकणारा सूर्य, रखरखत्या उन्हाने तापणारे रस्ते अशा परिस्थितीत अनवाणी प्रवास करणारे भाविक पायी मार्गाने सप्तश्रृंगगडावर दाखल झाले आहेत. वर्षागणिक भाविकांची गर्दी वाढल्याचे चित्र बघायला मिळते. यंदाही भाविकांच्या गर्दीत वाढ झाली आहे.

तापत्या उन्हामुळे भाविक रात्री पायी प्रवास करत अन दिवसा मिळेल त्या सावलीत विश्रांती करत. मात्र यंदाच्या वर्षी कितीही ऊन असले तरी अविश्रांत चालत आहेत. एकूणच रस्ते भाविकांच्या गर्दीने वाहत असल्याचे चित्र आहे. देवीची आजची पंचामृत महापूजा श्री सप्तश्रृंग निवासिनी देवी ट्रस्टचे विश्वस्त भूषणराज तळेकर यांनी परिवारासमेवत केली. सध्या





सप्तश्रृंगगडावर भाविकांची मांदियाळी बघायला मिळत आहे. शिवालय परिसरात भाविकांच्या विशेष सेवेसाठी निवारा शेड उभारण्यात आला आहे. त्यात दिवस सत्रात नामांकित शाहीरांच्या माध्यमातून देवीचा जगराता केला जात आहे तर रात्र सत्रात महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनसेवा दिली जात आहे. आतापर्यंत शाहीर रोहित दुग्गल, शाहीर सुयोग खर्डे यांनी देवीचा जगराता सादर केला तर हभप रमेश महाराज गांगुर्डे, हभप समाधान महाराज भोजेकर, हभप भाऊसाहेब महाराज जाधव, हभप भरत महाराज पानसरे, हभप गोकुळ महाराज पुंड यांनी कीर्तन सेवा दिली.

## 'आर्ट ऑफ लिव्हिंग'चे अपेक्स मेंबर म्हणून डॉ. उमेश मराठे यांची नियुक्ती

**नाशिक ।** परमपूज्य श्री श्री रविशंकरजी संस्थापित दी आर्ट ऑफ लिव्हिंग संस्था गेली ४५ वर्षापासून जगभर सेवा कार्य करीत आहे. संस्थेचे कार्य १७६ देशांमध्ये पोहोचले आहे.

व्याधी रहित शरीर, चिंतामुक्त मन व हिंसामुक्त समाज निर्मितीसाठी प्राणायाम ,योग ,सेवा, सत्संग या माध्यमातून व वैशिष्ट्यपूर्ण सुदर्शन क्रियेद्वारे हे साध्य होत आहेदि आर्ट ऑफ लिव्हिंग या संस्थेचे महाराष्ट्र राज्य अपेक्स बॉडी (राज्य समन्वयक) म्हणून डॉ उमेश मराठे यांची नियुक्ती झाली आहे, डॉ उमेश मराठे यांच्याकडे नाशिक, अहिल्यानगर, धुळे, नंदुरबार, जळगाव, व संभाजीनगर या सहा जिल्ह्यांची जबाबदारी देण्यात आली आहे



.या सर्व जिल्ह्यात गुरुदेवांचे कार्य अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी डॉ उमेश मराठे यांच्याकडे आहे, आनंदभूती शिबिरे, युवक नेतृत्व कार्यक्रम, श्री श्री संस्कार केंद्र, प्रज्ञायोग, श्री श्री योगा शिबिरांचे आयोजन करणे तसेच नद्यांचे पुनर्जीवन ,जलयुक्त शिवार योजना, वृक्षारोपण, सेंद्रिय शेती प्रशिक्षण ,कौशल्य विकास कार्यक्रम, वैदिक धर्म संस्थान कार्यक्रम ,इत्यादी सेवा योजना राबवणे, आर्ट ऑफ लिव्हिंग च्या माध्यमातून महा कुंभाचे नियोजन करण्यात सहभागी होणे . डॉ उमेश मराठे हे नामांकित लॅप्रोस्कोपिक सर्जन व वंध्यत्व निवारण तज्ञ असून 2007 पासून गुरुदेवांसोबत कार्यरत आहे. ते वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रात नाशिक शहर व जिल्ह्यामध्ये प्रभावीपणे सातत्याने कार्यरत आहे. डॉ उमेश मराठे यांची नियुक्ती झाल्याने आर्ट ऑफ लिव्हिंग परिवारात आनंदाचे वातावरण आहे.

परिवाराच्या वतीने श्री विजयजी हाके (ट्रस्टी आर्ट ऑफ लिव्हिंग) स्वामी प्रणवानंदजी(ट्रस्टी वैदिक धर्म संस्थान) स्वामी वैशंपायन ॲड बिपीन शिंगाडा, निवृत्ती काकड चिराग पाटील, राहुल पाटील, ॲड विशाल चव्हाण, इंजि प्रसाद पिंपळे, सीए उल्हास पाटील, खंडू गांगुर्डे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## सातपूर कॉलनीतील दक्षिणेश्वर हनुमान मंदिरात यंदाही भंडारा

### सुमारे तीन दशकांपासूनची अखंडित परंपरा

**नाशिक ।** पवनपुत्र हनुमान जन्मोत्सव शहर-जिल्ह्यात सर्वत्र अति उत्साहात साजरा केला जातो. शनिवारी (दि. १२) हनुमान जयंती असून, सर्व हनुमान मंदिरात जयंती उत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आहे. त्याचाच एक भाग म्हणून कामगार बहुल वसाहत असलेल्या सातपूर कॉलनी येथील दक्षिणेश्वर हनुमान मंदिरातही जोरदार उत्सव साजरा केला जाणार आहे.

सातपूर कॉलनी येथील हे दक्षिणेश्वर हनुमान मंदिर जुने असून, येथे गेल्या तीन दशकांपासूनची भंडाऱ्याची परंपरा आहे. हनुमान जयंतीच्या दिवशी महाप्रसादाचे वाटप केले जाते. सातपूर कॉलनीतील रहिवाशी एकत्र येऊन स्वखर्चाने हा उपक्रम राबवितात. भाजी-पुरी, डाळ-भात, बुंदी वा अन्य गोड पक्वान्नाच्या महाप्रसादाचे वाटप केले जाते. मंदिराच्या पुढेच भलामोठा मंडप टाकून तेथेच पंक्तीत हजारो भाविकांना





महाप्रसादाचे ववतो केले जाते. त्यासाठी सातपूर कॉलनीतील युवा वर्ग, तरुण मंडळी, महिला आणि पुरुषांची मांदियाळी भाविकांच्या दिमतीला असते. सातपूर कॉलनीतील अवघे रहिवाशी त्यासाठी श्रमदान करतात. तन-मन-धनाने हे नागरिक हा उत्सव साजरा करतात. महाप्रसादाचे सेवन केल्यावर भाविकांना शुद्ध जलही पुरविले जाते. त्यासाठी पाण्याचे टँकर मागविले जातात. याशिवाय पाण्याचे मोठे बॅरल, कॅन ठेवलेल्या असतात. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने भाविकांना हनुमंताच्या दर्शनासाठी बारीने सोडले जाते. तितक्याच शिस्तीने महाप्रसादासाठी पंक्ती बसविल्या जातात. महाप्रसाद वाटप काळात अनेक हजारोंच्या संख्येने नागरिक भोजन करतात. एवढा मोठा उत्सव असला तरी कोणीही वैयक्तिक प्रसिद्धीसाठी पुढे येत नाही. सर्व सदस्य आणि सर्वच पदाधिकारी या भावनेने या उत्सवात सहभाग घेतात. त्यामुळे आजपर्यंत कधीही कार्यक्रमाला कुठेही गालबोट लागलेले नाही.

दक्षिणेश्वर हनुमान मंदिर मित्र मंडळ हीच प्रत्येकाची ओळख आहे. गेल्या आठ-पंधरा दिवसापासून हनुमान जन्मोत्सवाची तयारी सुरू आहे. यंदाही हा उत्सव अति उत्साहात साजरा होईल, असा विश्वास येथील रहिवाशांनी व्यक्त केला.

# अस्मिता



## पर्याय चॉकलेट वॅक्सचा

## हे सक्षम महिलांचे स्टेशन




## कलिंगड खरेदी करताना...




## पीएचडीची तयारी?



## सर्वात मोठे आव्हान





## आहारात हव्या चिया सीड्स



## सदाबहार जीन्स







# अलमट्टीची उंची वाढविण्याच्या कर्नाटक शासनाच्या विरोधात सांगली, कोल्हापूर बंदचा निर्णय



सांगली, दि. १० प्रतिनिधी

अलमट्टी धरणाची उंची वाढविण्याच्या कर्नाटकच्या हट्टाला विरोध करण्यासाठी सांगली, कोल्हापूरमध्ये बंद पाळण्याचा निर्णय सांगलीत झालेल्या बैठकीत घेण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अरूण लाड यांनी आयोजित केलेल्या या बैठकीकडे पूरग्रस्त भागातील खासदार वगळता अन्य लोकप्रतिनिधींनी पाठ फिरवली.

कर्नाटकचे उपमुख्यमंत्री शिवकुमार यांनी अलमट्टी धरणाची उंची ५ मीटरने वाढवून ५२४ मीटर करण्यात येईल असे सांगत तसा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविला असल्याचे सांगितले. उंचीवाढ करण्यास कृष्णा खोरे पाणी वाटप लवादाने यास मान्यता दिली असल्याचेही शिवकुमार यांनी सांगितले आहे. याबाबत विचारविनिमय आणि पुढील दिशा निश्चित करण्यासाठी या बैठकीचे आयोजन आ. लाड यांनी केले होते.

यावेळी बोलताना सांगलीचे खासदार विशाल पाटील म्हणाले, अलमट्टी धरणाची उंचीवाढ झाली तर धरणातील पाण्याचा फुगवटा वाढणार असून याचा फटका सांगलीसह कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक गावे व शेतींना बसणार आहे. 'बॅंक वॉटर'मुळे पावसाळ्यात नदीला आलेल्या पुराच्या पाण्याचा निचरा होण्यास वेळ लागणार असून याचा मोठा फटका कृष्णासह वारणा, पंचगंगाकाठी असलेल्या गावांना व शेतीला बसणार आहे. महाराष्ट्र शासनाने याचा विचार करून या उंचीवाढीला विरोध करायला हवा.

यावेळी उपस्थित असलेले तासगाव-कवठेमहांकाळचे आमदार रोहित पाटील यांनीही याबाबत संघर्ष करावा लागला तरी आपण सोबत राहू असा विश्वास दिला. बैठकीचा आढावा घेऊन निमंत्रक आ. लाड म्हणाले, की कर्नाटकचे उपमुख्यमंत्री शिवकुमार यांनी कृष्णा खोरे पाणी वाटप लवादाने यास मान्यता दिल्याचा दावा केला आहे. वास्तविक पाहता लवादाने महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तेलंगणा या राज्यांना विश्वासात न घेता कर्नाटकला पाच मीटरने अलमट्टीची उंची वाढविण्यास परवानगी कशी दिली? हा आमचा सवाल आहे.

कृष्णा खोरे पाणी वाटप लवादाप्रमाणे केंद्र सरकारची मान्यता असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेऊन अलमट्टीची उंची वाढविण्याच्या प्रस्तावास विरोध केला पाहिजे, असे आमचे म्हणणे आहे. याचे कारण असे की, 'बॅक वॉटर'चा फटका प्रामुख्याने महाराष्ट्राला बसतो. यासाठी सन २०१७, २०१९ व २०२२ ला आलेल्या महापुरामध्ये महाराष्ट्रातील सांगली, कोल्हापूर, इचलकरंजी यांसारख्या शहरांचे तसेच नदीकाठावरील गावांचे झालेले नुकसान यांचा अहवाल केंद्र सरकारकडे सादर केला पाहिजे.

पावसाळ्यातील महापुराची तीव्रता कमी करण्यासाठी नदीजोड प्रकल्प तातडीने राबवून हे महापुराचे पाणी दुष्काळी भागामध्ये वळविणे गरजेचे आहे. कृष्णा खोरे पाणी वाटप लवादाने पूर्वी केलेल्या पाणी वाटपाच्या निर्णयामध्ये बदल करण्याची गरज असून भविष्यामध्ये नदीजोड प्रकल्पासाठी लागणाऱ्या अतिरिक्त पाण्याचा विचार होणे गरजेचे आहे. म्हणून महाराष्ट्राने लवादाचा यापूर्वीचा पाणीवाटप निर्णय रद्द करून नवीन पाणीवाटप करार झाला पाहिजे, असा अट्टाहास करावा.

अलमट्टी धरणाची उंची वाढविण्यास विरोध करण्यासाठी सांगली, कोल्हापूर जिल्ह्यात एक दिवस बंद पाळण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. या बंदची तारीख लवकरच जाहीर करण्यात येईल असे आ. लाड यांनी सांगितले. दरम्यान, या बैठकीस महापुराचा धोका असणाऱ्या गावातील लोकप्रतिनिधींनी कळवूनही त्यांनी अनुपस्थिती दर्शवली.

# चीन उदार झाला, ५ टक्क्यांचा डिस्काऊंट दिला
## भारतात टीव्ही, फ्रिज, मोबाईल स्वस्त होणार

नवी दिल्ली, दि. १० वृत्तसंस्था

अमेरिकेने १२५ टक्के टेरिफ लावताच चीननेभारताला गोंजारायला सुरुवात केली आहे. लडाखवरून चीनभारताला गेल्या काही वर्षांपासून त्रास देत आहे. अरुणाचल प्रदेशपासून ते लडाखपर्यंत चीन भारतीय भूभागावर अतिक्रमण करत आहे. तसेच सीमेवर शस्त्रास्त्रांचा साठा करू लागला आहे. परंतु, अमेरिकेने ट्रेड वॉर सुरु केल्यानंतर लगेचच चीनने भारताला गोंजारायला सुरुवात केली आहे.

म्हणतात राजा उदार झाला आणि भोपळा दान दिला तसेच अगदी चीनने भारतासोबत केले आहे. ट्रेड वॉर सुरु होताच आता चीनच्या कंपन्या तळमळू लागल्या आहेत. चिनी इलेक्ट्रॉनिक कंपोनंट कंपन्यांनी भारतीय कंपन्यांना पार्ट घेतले तर लगेचच ५ टक्के सूट देऊ केली आहे. आता भारतीय कंपन्या देखील ही संधी उचलण्याची शक्यता आहे.

यामुळे येत्या काळात हा मिळत असलेला डिस्काऊंट बाराजात वस्तूंची मागणी वाढविण्यासाठी या कंपन्या ग्राहकांना देखील देण्याची शक्यता आहे. असे झाले तर भारतात टीव्ही, फ्रिज, स्मार्टफोन आदी इलेक्ट्रॉनिक वस्तू स्वस्त होऊ शकतात. ईटीने याबाबतचे वृत्त दिले आहे. अमेरिकेत चीनमधून येणाऱ्या वस्तू महागणार आहेत. जवळपास याची किंमत दुप्पट होणार आहे. यामुळे मागणी कोसळणार आहे. मागणी कमी होणार असल्याने चिनी कंपोनंट बनविणाऱ्या कंपन्यांची झोप उडाली आहे. यामुळे या कंपन्या भारतीय कंपन्यांना डिस्काऊंट देऊ लागल्या आहेत. चीनवर १२५ टक्के टेरिफ लावल्याने १०० डॉलरची वस्तू आता अमेरिकेत २२५ डॉलर्सला मिळणार आहे. दरम्यान, ट्रम्प यांनी चीन सोडून अन्य देशांवर टेरिफ लावण्याचे ९० दिवसांसाठी रोखले आहे. चीनने जागतिक बाजारासाठी सन्मान दाखविला नाही. यामुळे त्यांच्यावर मी टेरिफ वाढवून १२५ टक्के करत आहे. अमेरिका आणि इतर देशांना लुटण्याचे दिवस गेले आहेत, हे चीन लवकरच समजेल असे आपल्याला वाटत असल्याचे ट्रम्प यांनी म्हटले आहे.

# पत्रकाराच्या हत्येसाठी सुपारी देणारा निघाला मंदिराचा पुजारी

सीतापूर, दि. १० प्रतिनिधी

उत्तर प्रदेशातील सीतापूर येथील पत्रकार राघवेंद्र बाजपेई हत्याकांडावर सीतापूर पोलिसांनी ३४ दिवसांनी खळबळनजक खुलासा केला आहे. ८ मार्च रोजी पत्रकार राघवेंद्र बाजपेई यांची लखनौ दिल्ली नॅशनल हायवेवर दिवसाढवळ्या गोळी मारून हत्या केली होती. पत्रकार मर्डर मिस्ट्री सोडवण्यासाठी १२ पथके नेमली होती. आता पोलीस अधीक्षक चक्रेश मिश्र यांनी या हत्याकांडावर पत्रकार परिषद घेत माहिती दिली आहे.



पोलीस अधीक्षक म्हणाले की, पत्रकाराच्या हत्येची सुपारी देणारा मंदिरातील पुजारी आहे. जो वेष बदलून महोली कोतवाली परिसरातील कारेदेव मंदिरात राहत होता. ज्याचं नाव शिवानंद उर्फ विकास राठोड असून तो रामकोट भागात राहायचा. पुजाऱ्याचे अल्पवयीन युवकासोबत संबंध होते. हे अनैसर्गिक कृत्य पत्रकाराने पाहिले होते. हा प्रकार लोकांसमोर उघडकीस येईल या कारणाने पुजाऱ्याने ४ लाखांची सुपारी देत शूटरकडून पत्रकाराची हत्या करुन घेतली.

आता पोलीस त्या शूटरचा शोध घेत आहेत जे अद्याप फरार आहेत. तपासात पोलिसांना त्यांचे नाव, पत्ते मिळाले आहेत. फरार आरोपी गुन्हेगारी पार्श्वभूमीचे असून ते सीतापूर भागातच राहायला आहेत. पोलिसांनी आरोपी पुजाऱ्याकडून १७ हजार रोकड आणि ३ फोन जप्त केलेत. या घटनेमागील विविध १५ अँगलचा तपास पोलीस करत आहेत. पत्रकाराच्या हत्येनंतर पोलिसांनी ४ हजार पेक्षा अधिक नंबरची तपासणी केली. त्यातील संशयित १०० पेक्षा अधिक नंबरच्या व्यक्तींना चौकशीला बोलावले होते.

दरम्यान, घटनेच्या दिवशी दुपारी ३ वाजता राघवेंद्र यांना एक फोन कॉल आला होता. त्यानंतर ते बाईकवरून जिल्हा मुख्यालयाच्या दिशेने जात होते. रस्त्यात सुल्तानपूर परिसरात उड्डाणपूलाच्या इथे काही अज्ञातांनी त्यांना थांबवून गोळीबार केला. गंभीररित्या जखमी पत्रकाराला तात्काळ जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले परंतु डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेनंतर लवकरात लवकर आरोपींना पकडण्यासाठी पत्रकारांनी पोलिसांवर दबाव आणला होता.

# टॅरिफ टाळण्यासाठी भारतातून 600 टन आयफोन अमेरिकेत केले एअरलिफ्ट

वॉशिंग्टन, दि. १० वृत्तसंस्था

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लागू केलेल्या टॅरिफ्सचा फटका टाळण्यासाठी टेक जायंट ॲपल कंपनीने भारतातून तब्बल ६०० टन आयफोन अमेरिकेत स्पेशल कार्गो विमानातून एअरलिफ्ट केले आहेत.

यातून जवळपास १५ लाख आयफोन अमेरिकेत रवाना केले आहेत. सूत्रांच्या हवाल्याने रॉयटर्सने याबाबतचे वृत्त दिले आहे.

अमेरिका ही आयफोन्सची सर्वात मोठ्या बाजारपेठांपैकी एक आहे. ट्रम्प टॅरिफ्स टाळण्यासाठी आणि अमेरिकेत आयफोन्सचा मोठा साठा करता यावा यासाठी ॲपल कंपनीने हे पाऊल उचलल्याचे दिसत आहे.

व्यापार विश्लेषकांनी नुकताच इशारा दिला होता की, iPhones च्या किंमती अमेरिकेत झपाट्याने वाढू शकतात, कारण आयफोन्सची आयात मोठ्या प्रमाणात चीनमधून होते. आता ट्रम्प यांनी चीनवर १२५ टक्के टॅरिफ लावले आहे. त्यामुळे अर्थातच अमेरिकेत आयफोन्सच्या किंमती वाढणार. पण त्यापुर्वीच आयफोन्सचा मोठा साठा ॲपलने भारतातून अमेरिकेत नेला आहे.

Apple कंपनीने चेन्नई विमानतळावर कस्टम क्लिअरन्ससाठी लागणारा वेळ ३० तासांवरून ६ तासांपर्यंत कमी करण्यासाठी भारतीय विमानतळ अधिकाऱ्यांकडे प्रयत्न सुरू केले. या कथित "ग्रीन कॉरिडॉर" व्यवस्थेची अंमलबजावणी Apple ने चीनमधील काही विमानतळांवरही केली होती.

मार्चपासून सुमारे १०० टन क्षमतेच्या सहा मालवाहू विमानांनी भारतातून उड्डाणे केली आहेत. त्यापैकी एक विमान या आठवड्यात उड्डाण करताना नवीन टॅरिफ लागू झाले, अशी माहिती आहे. एकंदरीत टॅरिफ आधीच माल अमेरिकेत न्यायचे ॲपलचे नियोजन होते.



iPhone 14 आणि त्याच्या चार्जिंग केबलसह पॅकेजचे वजन सुमारे ३५० ग्रॅम आहे. त्यामुळे ६०० टनाच्या कार्गोमध्ये सुमारे १५ लाख iPhones होते, असे गृहित धरता येते. दरम्यान, Apple आणि भारताच्या नागरी उड्डाण मंत्रालयाने या संदर्भात काहीही टिप्पणी केलेली नाही.

# "तू 10.30 पर्यंत जेलमध्ये असशील..."; पत्नीने ठेवला स्टेटस
## भीतीपोटी पतीने जीवन संपवले

बरेली, दि. १० वृत्तसंस्था

उत्तर प्रदेशच्या बरेली इथं पत्नीच्या त्रासाला कंटाळून पतीने आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. सुसाईड करण्यापूर्वी या युवकानं त्याच्या आईला मी कायमचा झोपायला चाललोय, मला उठवू नका असं म्हटलं. मुलाच्या बोलण्याचा अर्थ आईला कळला नाही. तो झोपायला गेलाय असं तिला वाटले. परंतु काही तासांनी आई त्याला उठवायला खोलीत पोहचली तेव्हा समोरील दृश्य पाहून तिच्या पायाखालची जमीन सरकली. खोलीत मुलीचा मृतदेह पंख्याला लटकलेल्या अवस्थेत तिने पाहिला. मृतक युवकाच्या कुटुंबाने या घटनेवरून सूनेवर गंभीर आरोप केले आहेत. २ दिवसांपूर्वीच राज पत्नी सिमरनला आणण्यासाठी तिच्या माहेरी गेला होता. दोघेही देहारादूनच्या एका कार्यक्रमाला जाणार होते. परंतु सूनेच्या माहेरच्यांनी राजसोबत पत्नी सिमरनला पाठवण्यास नकार दिला. तिच्या भावांनी राजला मारहाण केली. दुसऱ्याच दिवशी माहेरच्यांनी सासरच्यांवर खोटा गुन्हा दाखल केला. युवकाच्या पत्नीने त्याला धमकीही दिली होती. पत्नीने सोशल मीडियावर पोस्ट करत १०.३० पर्यंत तू जेलमध्ये जाशील, बेस्ट ऑफ लक असा मेसेज पतीचा फोटो लावून पोस्ट केला होता. महिलेने तिच्या पोलीस भावाला हाताशी धरून पतीला मारहाण केल्याचाही आरोप आहे. १ वर्षापूर्वीच राज आणि सिमरन यांचं लग्न झाले होते. सिमरन दिवसभर कुणाशी तरी बोलत राहायची. बऱ्याचदा कुटुंबातील सदस्य आणि पतीने समजावूनही तिने एकले नाही. पती राजने तिच्या घरच्यांनाही ही बाब सांगितली परंतु काहीच फायदा झाला नाही. लग्नानंतर या दोघांना १ मुलगाही आहे. ज्या पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली तिथे सिमरनचा भाऊही तैनात आहे. त्याने राज आणि त्याच्या वडिलांना सर्वांसमोर मारहाण करत जेलमध्ये पाठवण्याची धमकी दिली होती. राज आर्य याच्या आत्महत्येनंतर पत्नी सिमरनसह ७ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृतकाचा भाऊ सुरेशने याबाबत तक्रार देत पत्नी सिमरनसह भाऊ सागर, त्याचे आई वडील, बहिण-दाजी यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. सागर हा बरेली पोलीस दलात शिपाई म्हणून कार्यरत आहे. सासरच्यांनी मानसिक छळ केल्यामुळेच राज आर्य याने गळफास घेत जीवन संपवलं असा आरोप त्याच्या भावाने केला आहे.

# प्रवीण तरडे म्हणताहेत, 'बोल मराठी!'

सिनेरंग

शिवछत्रपतींच्या मराठी लेकरांनो, काय सांगतोय ते नीट एका असं म्हणत मराठी भाषेची थोरवी असलेला 'बोल मराठी' हा नवा म्युझिक व्हिडिओ लॉंच करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, लेखक, दिग्दर्शक, अभिनेता प्रवीण तरडे यांनी हे गाणं गायलं असून, या गाण्याचं संगीत अभिजीत कवठाळकर यांनी दिलं आहे. बोल मराठी या म्युझिक व्हिडिओची निर्मिती लंकेश म्युझिकने केली आहे. प्रवीण तरडे यांच्यासह मृण्मयी फाटक यांनीही गायन केलं आहे. हृषिकेश विदार यांनी गीतलेखन केलेल्या या म्युझिक व्हिडिओचं दिग्दर्शन राजेश कोलन यांचं आहे. योगेश कोळी यांचं छायांकन, अमोल निंबाळकर यांनी संकलन, तक सिद्धार्थ तातूसकर यांनी कला दिग्दर्शन केलं आहे. मराठी भाषेला अलीकडेच अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. या अनुषंगाने मराठी भाषेची महती बोल मराठी या गाण्यात सांगण्यात आली आहे. अत्यंत सोपे शब्द, श्रवणीय संगीत असलेलं हे गाणं आहे. संगीतकार अभिजीत कवठाळकर यांनी आतापर्यंत अनेक मराठी चित्रपट, म्युझिक व्हिडिओचं संगीत दिग्दर्शन केलं आहे. तर प्रवीण तरडे यांनी प्रथमच म्युझिक व्हिडिओचं गाणं गायलं आहे. युट्यूबवर लंकेश म्युझिक या चॅनेलवर हा म्युझिक व्हिडिओ लॉंच करण्यात आला आहे.




# उन्हाळ्याच्या सुट्टीची नोस्टालजिक सफर घडवणारे 'एप्रिल मे 99'चे गाणे प्रदर्शित




लोकरंजन

परीक्षा संपल्या की सुरु होतो सुट्टीचा धमाल काळ! उन्हाळी सुट्टी म्हणजे फक्त मस्ती, खेळ, गंमतीजंमती. याच भन्नाट सुट्ट्यांच्या रंगतदार वातावरणात 'एप्रिल मे ९९' चित्रपटातील 'ताकुंबा' हे गाणं प्रदर्शित झाले आहे. सुप्रसिद्ध कोरिओग्राफर रेमो डिसूझा यांच्या हस्ते सोशल मीडियावर हे गाणे प्रदर्शित करण्यात आले आहे. वार्षिक परीक्षा संपल्यावर मुले टेन्शन फ्री असतात आणि मग त्यांचे आवडीचे दिवस सुरु होतात. उन्हाळ्याच्या सुट्टीत उनाडपणा, खेळ, गावभर फिरणे या सगळ्या नॉस्टॅलजीक क्षणांचा अनुभव या गाण्यातून मिळणार आहे. आर्यन मेंगजी (कृष्णा), श्रेयस थोरात (प्रसाद) आणि मंथन काणेकर (सिद्धेश) यांच्यावर चित्रित करण्यात आलेल्या धमाल, मस्ती आणि एनर्जीने भरलेले हे गाणे रोहन-रोहन यांनी संगीतबद्ध केले असून त्यांचाच जबरदस्त आवाज या गाण्याला लाभला आहे. विशेष म्हणजे या गाण्याचे शब्द दिग्दर्शक रोहन मापुस्कर व गीतकार प्रशांत मडूपवार यांनी लिहिले आहेत. सगळ्यांना थिरकायला लावणाऱ्या या गाण्याचे नृत्य दिग्दर्शन स्टॅनली डिकॉस्टा यांनी केले आहे. या गाण्याची आणखी एक खासियत म्हणजे यानिमित्ताने रोहन, मापुस्कर राजेश मापुस्कर, रेमो डिसूझा, मधुकर कोटीयन आणि स्टॅनली डिकॉस्टा हे एकत्र आले आहेत. करिअरला सुरूवात केल्यापासून यांची घट्ट मैत्री आहे. यानिमित्ताने मैत्रीच्या चित्रपटासाठी मित्र पुन्हा भेटले. मापुस्कर ब्रदर्स इन असोसिएशन विथ फिंगर प्रिंट फिल्म्स, नेक्सस अलायन्स, थिंक टॅंक आणि मॅगीज पिक्चर्स प्रस्तुत 'एप्रिल मे ९९' या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन रोहन मापुस्कर यांनी केले असून राजेश मापुस्कर, मधुकर कोटीयन, जोगेश भूटानी , मॉरिस नून हे निर्माते आहेत तर लॉरेन्स डिसोझा सह निर्माते आहेत.

# 'कभी नीम नीम कभी शहद शहद' मालिका लवकरच स्टार प्लस'वर

'स्टार प्लस' वाहिनी प्रेक्षकांकरता नेहमीच हृदयस्पर्शी कथा, अविस्मरणीय पात्रे आणि प्रेक्षकांना हृदयाला स्पर्श करणारे नाट्य पेश करत असते. प्रेमकथा असो वा नाट्य असो अथवा बदलत्या कुटुंबांच्या कहाण्या असोत, 'स्टार प्लस' वाहिनी नव्या, नव्या विषयांवर मालिका सादर करण्यात अग्रेसर आहे. हाच वारसा जपत 'स्टार प्लस' वाहिनी प्रेक्षकांकरता 'कभी नीम नीम कभी शहद शहद' ही नवी मालिका सुरू करत आहे. या मालिकेत एक अनोखी प्रेमकथा दाखवण्यात आली आहे, जी प्रेक्षकांच्या मनाला नक्कीच स्पर्श करेल.

टेलीरंग

'कभी नीम नीम कभी शहद शहद' या आगामी मालिकेचा प्रोमो नुकताच प्रदर्शित झाला आहे. या प्रोमोत प्रेक्षकांना मालिकेतील नाट्याची एक झलक पाहायला मिळेल. या मालिकेत उत्कट आणि दृढ इच्छाशक्ती असलेली- कथा ही महिला




दाखविण्यात आली आहे, जिला रोपांचे संगोपन करणे अतिशय प्रिय आहे, आणि ते करताना कथाला एक शांतता लाभते, तिला एक उद्दिष्ट गवसते. निसर्गाशी कथाचे जे नाते आहे, त्या नात्यातून तिची आंतरिक शांतता आणि स्वतंत्र भावना प्रतिबिंबित होते. दुसरीकडे, उदय हा एक उमदा शेफ आहे, ज्याचा सुग्रास खाणे बनविण्यावर विश्वास आहे.एकदा रस्त्यावर या दोघांची परस्परांशी टक्कर होते, आणि त्यात कथा तिच्याकरता मोलाचे असलेले जे रोप ती नेत होती, ते रोप उन्मळून पडते. कथाला राहवत नाही आणि ती उदयला उलटसुलट सुनावते आणि त्याचा अपमान करते.'कभी नीम नीम कभी शहद शहद' या मालिकेच्या कथेतून परस्परविरोधी व्यक्तिमत्त्वे परस्परांकडे कशी आकर्षित होतात आणि त्यातून त्यांचे भावबंध कसे जुळून येतात, हे दाखवले आहे. हे अनोखे, अपारंपरिक नाते कसे फुलते हे पाहण्याकरता २१ एप्रिलपासून संध्याकाळी ७ वाजता स्टार प्लस वाहिनीवर 'कभी नीम नीम कभी शहद शहद' ही मालिका पाहायला विसरू नका.

संकलन –संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# धमक्या, ब्लॅकमेलनी चीन बधणारा नाही, चर्चेसाठी आमचेही दरवाजे खुले; चीन भूमिकेवर ठाम

बीजिंग, दि.१० वृत्तसंस्था

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २ एप्रिल रोजी जगातील ७० देशांवर समन्यायी आयातशुल्क लादले होते. मात्र त्यावर गदारोळ निर्माण झाल्यानंतर ट्रम्प प्रशासनाने बहुसंख्य देशांवरील आयातशुल्काला ९० दिवसांची स्थगिती दिली. मात्र चीनवरील आयातशुल्क १२५ टक्क्यांपर्यंत वाढवून व्यापारयुद्ध अधिक तीव्र केले. बुधवारी तातडीने ही शुल्कवाढ केल्यानंतर आता चीनकडूनही याला प्रत्युत्तर देण्यात आले आहे. गुरूवारी चीनच्या वाणिज्य मंत्र्यांनी वॉशिंग्टनशी चर्चा करण्यासाठी आम्ही तयार असल्याचे जाहीर केले. मात्र त्याआधी एकमेकांचा आदर राखत समान वागणूक द्यायला हवी, असे आवाहन त्यांनी केले.



चीनच्या वाणिज्य मंत्रालयाचे प्रवक्ते हे योंगकियान यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, धमक्या आणि ब्लॅकमेल ही चीनशी व्यवहार करण्याची योग्य पद्धत होणार नाही.

डोनाल्ड ट्रम्प यांनी एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात चीनसह सर्व देशांवर आयातशुल्क लादल्यानंतर चीनकडूनही तीव्र प्रतिक्रिया उमटली होती. चीनने अमेरिकन वस्तूंवर शुल्क लादल्याची घोषणा केली होती. त्यामुळेच बुधवारी अमेरिकेने बहुसंख्य देशांवरील आयातशुल्काला स्थगिती दिल्यानंतर चीनवरील आयातशुल्क १२५ टक्क्यांपर्यंत वाढविला.

३ एप्रिल रोजी अमेरिकेने चीनवर ३४ टक्के आयातशुल्क लादले होते. दुसऱ्या दिवशी चीननेही अमेरिकन वस्तूंवर ३४ टक्के आयातशुल्क लादण्याची घोषणा केली. चीनच्या या निर्णयावर डोनाल्ड ट्रम्प यांनी नाराजी व्यक्त केली. चीनचा हा निर्णय चुकीचा असल्याचे ते म्हणाले. ट्रम्प यांनी ट्रूथ या सोशल नेटवर्किंग साईटवर लिहिले की, चीनने मोठी चूक केली आहे. ते बिथरले असून ही चूक त्यांना परवडणारी नाही.

त्यानंतर या आठवड्यात मंगळवारी अमेरिकेने चीनवर १०४ टक्के अतिरिक्त आयातशुल्क लावले. अमेरिकेच्या आक्रमक भूमिकेनंतर चीननेही त्याला जशास तसे उत्तर देत अमेरिकेच्या मालावरील आयातशुल्क ३४ टक्क्यांहून वाढवत ८४ टक्के केले. १० एप्रिलपासून याची अंमलबजावणी सुरू झाली.

गेल्या वर्षी दोन्ही देशांत मिळून एकूण ५८५ अब्ज डॉलरचा व्यापार झाला. पण यात अमेरिकेतून चीनमध्ये होणाऱ्या निर्यातीचे मूल्य १४५ अब्ज डॉलर इतके आहे. याउलट चीनकडून अमेरिकेला होणारीचे निर्यातीचे मूल्य ४४० अब्ज डॉलर इतके आहे. म्हणजे २९५ अब्ज डॉलरचे आधिक्य (सरप्लस) चीनकडे आहे. तितकीच तूट (डेफिसिट) अमेरिकेकडे आहे.

# बारावीतल्या मुलाशी लग्न करण्यासाठी तीन मुलांच्या आईने दुसऱ्या नवऱ्याला दिला घटस्फोट

अमरोहा, दि. १० वृत्तसंस्था

३० वर्षांच्या एका महिलेने बारावीतल्या मुलाशी लग्न करण्यासाठी हिंदू धर्म स्वीकारला आहे. एवढंच नाही तर तीन मुलांच्या आईने प्रियकराशी लग्न करण्यासाठी तिच्या दुसऱ्या नवऱ्याला आणि तीन मुलांना सोडून दिलं आहे. शबनम नावाच्या ३० वर्षीय महिलेने तिच्या दुसऱ्या नवऱ्याला आणि तीन मुलांना सोडून दिलं आहे. बारावीत शिकणाऱ्या एका मुलाशी तिने लग्न केलं आहे.


३० वर्षीय शबनमने हिंदू धर्म स्वीकारला आणि शिवानी हे नाव स्वीकारलं. त्यानंतर १२ वीत शिकणाऱ्या प्रियकराशी लग्न केलं. ही घटना उत्तर प्रदेशातील अमरोहा येथील आहे. हंसपूर सर्कल पोलीस ठाण्याचे अधिकारी दीप कुमार पंत यांनी इंडियन एक्स्प्रेसला दिलेल्या माहितीनुसार शिवानीचं पूर्वीचं नाव शबनम असं होतं आणि तिची दोन लग्न झाली आहेत. नवऱ्याला घटस्फोट देत शबनमने हिंदू धर्म स्वीकारला आणि शिवा नावाच्या १२ वीला शिकणाऱ्या तरुणाशी लग्न केलं आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीतीनुसार शिवानी आणि शिवा या दोघांनी लग्नानंतर त्यांचा एक व्हिडीओही सोशल मीडियावर पोस्ट केला आहे. यामध्ये शिवानी म्हणते आहे की ती लग्नानंतर आनंदी आहे आणि तिला तिच्या पतीला म्हणजेच शिवाला कुणीही त्रास देऊ नये. शिवानीची एकूण दोन लग्नं यापूर्वी झाली आहेत. ९ वर्षांपूर्वी तिचं दुसरं लग्न तौफिकसह झालं होतं. या दोघांना तीन मुली आहेत.

वर्षभरापूर्वी तौफिकचा अपघात झाला आणि तो शारिरीकदृष्ट्या कमकुवत झाला. दरम्यान तौफिक ई रिक्षा चालवून उदरनिर्वाह करत होता. याच कालावधीत शबनम उर्फ शिवानी शिवा नावाच्या मुलाच्या प्रेमात पडली. त्यानंतर या दोघांनी लग्नाचा निर्णय घेतला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शिवानीची पहिली भेट २०११ मध्ये एका विवाहीत माणसाशी झाली होती. हे दोघं मेरठमध्ये भेटले. त्यानंतर या दोघांनी लग्न केलं. पण नंतर दोघांचा घटस्फोट झाला. त्यानंतर शबनमच्या आयुष्यात तौफिक आला. तौफिक आणि तिचं लग्न झालं. आता तिचा तो संसारही मोडला आहे तिने शिवा नावाच्या बारावीत शिकणाऱ्या मुलाशी लग्न केलं आहे. त्यासाठी तिने धर्मांतर करुन शिवानी हे नावही घेतलं आहे.

# रिझवानने दिली कर्णधारपद सोडण्याची धमकी



इस्लामाबाद, दि. १० वृत्तसंस्था

पाकिस्तानची मागील काही वर्षांमध्ये क्रिकेट खेळात झालेली घसरण हा चर्चेचा विषय ठरला आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्ड आणि क्रिकेटपटूमधील मतभेदामुळे खेळाचा दर्जा कमालीचा घसरला आहे. आता पुन्हा एकदा हा वाद चव्हाट्यावर आला आहे. आता मोहम्मद रिझवान याने थेट पाकिस्तान क्रिकेट बोर्डला पाकिस्तानच्या वनडे संघाच्या कर्णधारपदाचा राजीनामा देण्याची धमकी दिली आहे.

नुकतीच चॅम्पियन्स ट्रॉफीचे आयोजनच पाकिस्तानमध्ये करण्यात आले होते. घराच्या मैदानावर पाकिस्तानच्या संघाने अत्यंत सुमार कामगिरीचे प्रदर्शन केले. साखळी फेरीत स्पर्धेत गारद होण्याची नामुष्की संघावर ओढावली. यानंतर पाकिस्तान क्रिकेट बोर्डने रिझवानची टी-२० कर्णधारपदावरून हकालपट्टी केली. बाबर आझमलाही संघातून बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला.

चॅम्पियन्स ट्रॉफीनंतर योग्य वागणूक न मिळाल्याने रिझवान संतापला आहे. आता त्याने पाकिस्तान क्रिकेट बोर्डकडे अतिरिक्त अधिकाराची मागणी केली आहे. आपल्याला अधिकार दिले नाही तर राजीनामा देण्याची धमकीही त्याने दिली आहे.असे म्हटले जात आहे की मोहम्मद रिझवान त्याच्याशी आणि बाबरशी वाईट वागणूक मिळाल्याने नाराज आहे. मोहम्मद रिझवान आणि बाबर आझम हे दोघेही येत्या काही दिवसांत पीसीबीचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांना भेटणार आहेत. यावेळी टी-२० फॉरमॅटच्या संघ निवडीबद्दल चर्चा करणार आहेत. तसेच वनडे कर्णधार म्हणून रिझवानला अधिक अधिकार हवे आहेत. चॅम्पियन्स ट्रॉफीमधील खराब कामगिरीनंतर पाकिस्तानी निवडकर्त्यांनी पुढील वर्षी होणाऱ्या टी-२० विश्वचषकावर लक्ष केंद्रित करण्यास सुरुवात केली आहे. याअंतर्गत, न्यूझीलंडविरुद्धच्या पाच टी-२० सामन्यांच्या मालिकेत तरुणांना प्राधान्य देण्यात आले. रिझवानच्या जागी सलमान आगा यांना कर्णधार बनवण्यात आले आहे.

महासागर NASHIK
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com